
# 'स्व' - रुपवर्धिनी

## कार्यवृत्त २००१



॥ विश्वमंगला मातृभू पदी, शुभसंकल्प स्फुरावे
'स्व'त्त्व, साधना, समर्पणातूनी राष्ट्र महान घडावे ॥





# यशोदीप केटरर्स

लग्न, मुंज, पार्टीकरिता भोजन, स्वागत समारंभ, आईस्क्रीम,
अल्पोपहार वगैरेची हॉलसहीत संपूर्ण व्यवस्था.

---

**बापू पंडित**

उत्कर्ष मंडळ, महंत चौक, महंत मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.
दूरध्वनी : ६११७५७६, ६१२३६०३

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००१

## ✤✤✤ अं त रं ग ✤✤✤


✍ हृदगत

✍ उध्वस्त मनांना सावरण्यासाठी

✍ वार्षिकवृत्त

✍ मला भावलेली वर्धिनी

✍ वेदना जाणवाया जागवू संवेदना

✍ मंतरलेले दिवस

✍ तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला

✍ काळोखातील काजवे



संपादक : श्री. जयंत कवठेकर

मुद्रण : प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ, पुणे - २.
अभय मुद्रणालय, टिळक रोड, पुणे - ३०.

मुखपृष्ठ : श्री. रवि देव
श्री. अवधूत फडणीस

मुखपृष्ठ सहाय्य : जनता बँक, पुणे, स्टाफ वेल्फेअर असोसिएशन

रेखांकने : श्री. शेखर साने
: कै. अरूण फडणीस

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

**पद्मभूषण डॉ. श्रीमती बानुबाई कोयाजी** **श्री. अविनाश वारदेकर**

## कार्यकारी समिती

**अध्यक्ष**
श्री. जयसिंहभाई मरिवाला

**कार्यकारी अध्यक्ष**
श्री. पु. व. श्रॉफ

**कार्याध्यक्ष**
श्री. कृ. गो. लवळेकर

**कोषाध्यक्ष**
श्री. श्री. शं. सामळ

**सहकार्याध्यक्षा**
श्रीमती कुंतला मुजुमदार

**सहकार्याध्यक्ष**
श्री. व. ना. दाते

**कार्यवाह**
श्री. रा. प. देसाई

**सहकार्यवाह**
श्री. शिरीष रा. पटवर्धन

## सभासद

श्री. प्रतापराव पवार
श्री. कां. गि. शहा
प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई
श्री. पुखराजजी जैन
श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. संजय विष्णू तांबट
श्री. वा. दे. संचेती
श्री. कृ. ल. पटवर्धन
श्री. उदय गुजर
सौ. चंद्राताई दलाया
श्री. नंदकिशोर सोंडूर
श्री. कन्हैय्यालाल बलदोटा

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे**
**फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र. ०८३९३०६०**
**आयकर सवलत आयकराच्या कलम ८० जी प्रमाणे व १००% सवलत कलम ३५ असी प्रमाणे.**
**संपर्काचा पत्ता :-** 'स्व-'रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - कार्यालय - ६१२१७०४, ६१३४३१० निवास - ५६५५८३५, ४२२१७७०
ई मेल : swaroop@wminet.net
**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृदगत्

भारतीय संस्कृतीच्या इतिहासात 'रावण' हे दानवी प्रवृत्तीचे प्रतीक मानले जाते. हजारो वर्षांनंतर आजही विजयादशमीच्या दिवशी देशाच्या अनेक भागात रावणाच्या प्रतिमेचे दहन केले जाते. 'रावण प्रवृत्ती'चा विनाश झाला पाहिजे आणि त्यासाठी 'रामशक्ती' उभी राहिली पाहिजे हा संस्कार जागा व्हावा आणि कार्यान्वित व्हावा ही खरं म्हणजे या प्रतिकात्मक दहनामागची मूळ प्रेरणा असावी. पण काळाच्या ओघात मूळ हेतू विसरला जातो आणि कर्मकांड उरते. तसेच याबाबतीतही झाले आहे असे वाटते.




काळ बदलला तरी आसूरी शक्ती नव्या रूपात जन्म घेतात आणि देशाला-समाजाला वेठीला धरतातच. रावण हा प्रचंड विद्वान होता, पराक्रमी होता; परंतु त्याची विद्वत्ता आणि पराक्रम समाजाच्या संस्कृतीला, सभ्यतेला घातक ठरू लागल्याने श्रीरामांना त्याचा वध करावा लागला. आजचा रावण हा कधी लादेनच्या रूपात, तर कधी एखाद्या छोट्याशा गावातल्या छोट्याशा गल्लीतील सामान्य जनतेचे जीवन भयग्रस्त करणाऱ्या स्थानिक गुंडाच्या रूपात उभा राहतो. शेवटी धोका तोच आणि म्हणून उपायही तोच-'रावण प्रवृत्तीचा' विनाशच झाला पाहिजे. त्यासाठी आजच्या काळात गरज आहे **रा**ष्ट्राविषयी **म**मत्व असणाऱ्यांच्या संघटित शक्तीचे दर्शन घडण्याची. ही शक्ती कशी निर्माण करता येईल? कै. ग. श्री. खैर यांनी एका लेखामध्ये म्हटले होते 'वानरं आहेत, राम हवा आहे'. उमलत्या पिढीजवळ असलेल्या प्रचंड उत्साहाकडे, कल्पनाशक्तीकडे पाहून याची खात्रीही पटते. आपापल्या कामांच्या माध्यमातून तरूण पिढी अशी घडवू या की जी कोणतेही आव्हान स्विकारील. आव्हानांच्या शिळा आपल्या कर्तृत्त्वसंपन्न हातामध्ये सहज पेलतील आणि त्या आव्हानांनाच संधी मानून त्यावरूनच यशाच्या नव्या वाटा कोरतील. कर्तृत्त्वाच्या बळावर साता समुद्रापलिकडे जाऊन पराक्रम गाजवतील. यावर्षीच्या मुखपृष्ठाचा आशय तोच आहे.

तरूणांच्याच हातात उज्ज्वल भारताचे भवितव्य आहे. यासाठी उभे रहायला हवे आहे असे नेतत्व जे तरूणांना योग्य मार्गदर्शनही करेल आणि सामान्य जनतेचा सहभागही राष्ट्रउभारणीच्या कामात करून घेईल. असे नेतृत्व उभे करण्याचा प्रयत्न देशामध्ये अनेक सामाजिक संस्था करीत आहेत. त्यांच्या मधीलच एका खारोटीच्या सहभागाचा हा वृत्तांत्त वर्ष २००१ मधील.

तसेच २००२ हे वर्ष स्वामी विवेकानंदांचे स्मृती शताब्दी वर्ष आहे. हे औचित्य लक्षात घेऊन या कार्यवृत्ताच्या तळटीपांमध्ये स्वामीजींचे ओजस्वी आणि प्रेरणादायी संदेश प्रत्येक पानावर दिलेले आहेत.

**माझ्या वीर युवकांनो, विश्वास असू द्या की तुम्ही सर्वजण महान कार्ये करण्यासाठी जन्मास आला आहात.**

# वार्षिकवृत्त




**भगिनी निवेदिता शाखा** : जुलै महिन्यात नवीन मुलींची निवड करण्यासाठी शाळाशाळांमध्ये संपर्क करून, याद्या जमविण्यास सुरूवात झाली आणि नवीन वर्धिकांची निवड परीक्षा घेण्यात आली. थोड्याच दिवसात नवीन मुली शाखेत येऊ लागल्या.

**पालकसभा**

वर्षाच्या सुरूवातीलाच पालकसभा घेण्यात आली. पालकसभेत श्री. शिरीष पटवर्धन सरांनी 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाचा परिचय करून दिला. पालकांशी बऱ्याच गप्पा झाल्या. पालकसभेत अनेक पालकांनी "आम्ही स्वतः शिकलो नाही, पण आमच्या मुलीने खूप शिकावे" अशी तळमळ प्रकट केली.

**कार्यक्रम विभाग**

**गुरूपौर्णिमा** : यावर्षी गुरूपौर्णिमेला शाखेत कथाकथनाची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे होते.



१) ग्रंथ हेच गुरू

२) आई माझा गुरू

३) निसर्ग हाच गुरू

**नागपंचमी** : यावर्षी नागपंचमीच्या कार्यक्रमाचे स्वरूप जरा वेगळे होते. शाखेत विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. मुलींनी खूपच छान प्रतिसाद दिला. काही मुलींनी समूहनृत्य, काहींनी वैयक्तिक नृत्य, तर काहींनी एकपात्री नाटक सादर केले. ५वी इयत्तेतील एका मुलीने इतके छान नृत्य केले की सर्व मुली 'once more, once more' असा प्रतिसाद देत होत्या. खरंच मुलींमध्ये खूप सुप्त गुण असतात. अशा काही कार्यक्रमांमुळे ते लक्षात येते व त्यांना वाव मिळतो.

**रक्षाबंधन** : या दिवशी सकाळी शाखेचा कार्यक्रम पाताळेश्वर मंदिरात झाला. मंदिरात येणाऱ्या सर्व भाविकांना मुलींनी राख्या बांधल्या आणि 'स्व'-रूपवर्धिनीची माहिती सांगितली. या कार्यक्रमामुळे रक्षाबंधनही साजरे झाले आणि लोकांपर्यंत 'स्व'-रूपवर्धिनीही पोहचली. त्यानंतर मंदिराच्या प्रसन्न वातावरणात उपासना झाली.

१५ ऑगस्टला शाखेत मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या.

**तुमच्यावर वज्रपात झाला तरी भिऊ नका. उठा आणि कार्याला लागा.**

शाखेत निबंध स्पर्धा, नाट्य स्पर्धा घेण्यात आल्या.

या वर्षी झालेली काही व्याख्याने -

वैद्य. विनेश नगरे आरोग्यम् धनसंपदा!

श्री. प्रविण महामुनी - वर्धिकांचे वर्तन कसे असावे?

मुलींच्या मनातील इंग्रजीची भीती घालविण्यासाठी शाखेत एकदा वर्धिकांना 'आम्ही इंग्रजी शिकतो' ही कॅसेट ऐकविली. ही कॅसेट ऐकल्यापासून एक विर्धका रोज इंग्लिशमध्ये दोन मिनिटे बोलते. या दोन मिनिटात कोणत्याही विषयावर इंग्लिशमध्ये बोलण्याचा मुली प्रयत्न करतात. त्यामुळे इंग्रजीची भीती तर जाईलच आणि आत्मविश्वासही वाढेल असे वाटते.

सप्टेंबर महिन्यात जेव्हा अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. त्या दरम्यान शाखेत गटशः या विषयावर चर्चा झाली. चर्चेनंतर सर्वांनी एकत्र बसून आपल्या गटातील चर्चेत काय काय मुद्दे आले हे मांडले. सर्वांची एकच प्रतिक्रिया होती की, दहशतवादाविरोधात आपण सर्वांनी एकत्र येऊन लढले पाहिजे.

**गणेशोत्सव सहभाग :-** यावर्षी सर्व शाखांनी केवळ पथकच नाही तर कार्यक्रमही बसवायचे असे ठरले होते. त्यामुळे लहान गटाचे झांज पथक होते, तर मोठा गट कार्यक्रमविभागात होता. शाखेने पथनाट्य बसविले होते. विषय होता - 'महिला सबलीकरण'. हा विषय निवडण्यामागचा हेतू हाच की लोकांपर्यंत आजची स्त्री पोहचावी. पथनाट्याबरोबर अहिल्यादेवी होळकर यांचा पोवाडाही शाखेने बसविला होता.



**प्रशिक्षण :-** यावर्षी शाखेत कु. आरतीताई बोराडे हिने कराटेचे प्रशिक्षण सुरू केले. आठवड्यातून ३ दिवस आरतीताई ५वी व ६वी इयत्तेतील मुलींना कराटे शिकविते.

**संपर्क :-** यावर्षी बालशाखेची मोठी बॅच आपल्या शाखेत आली. त्यामुळे पालकांना शाखा आधीपासूनच परिचित होती.



संपर्काच्या वेळी बऱ्याच पालकांची तक्रार हीच होती की आमची मुलगी व्यवस्थित जेवत नाही. या अनुभवामुळेच वैद्य विनेश नगरे यांच्या व्याख्यानाची रचना केली होती.

**तुमच्या देशाला वीरांची आवश्यकता आहे; वीर बना. पर्वताप्रमाणे दृढ व्हा - तुमचा निश्चय कधीही ढळू देऊ नका.**

**<u>राजमाता जिजाऊ शाखा</u> :**

**दि : १ जून २००१.** भगिनी निवेदिता शाखेच्या वर्धापन दिनाच्या दिवशी राजमाता जिजाऊ, भगिनी निवेदिता व आजोळ या तीनही शाखांची एकत्र सहल सिंहगडावर गेली. सिंहगड फिरून झाल्यानंतर व भोजनानंतर श्री. शिरीष पटवर्धन यांचे सत्र झाले. हे सत्र सरांनी प्रश्नोत्तर स्वरूपात घेतले. स्वप्न ही बाळगलीच पाहिजेत व ती पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न केले पाहिजेत हे सांगताना सरांनी आपला एक वर्धक जो प्रतिकूल परिस्थितीत शिकून सध्या अमेरिकेत आहे व MS पदवी परीक्षेमध्ये ८७.५% गुण मिळविले आहेत, त्याच्याबद्दल माहिती सांगितली. तसेच एक वर्धिका जिने शिक्षण पूर्ण झाल्यावर अरूणाचलमध्ये जाऊन काम केले व आता Ph.D करीत आहे, तिचीही माहिती सांगितली.



**गुरूपौर्णिमा :** गुरूपौर्णिमेला गुरूंचा महिमा सांगणाऱ्या अनेक गुरूशिष्यांच्या कथा सांगितल्या जातात. आपण नेहमीच इतरांकडून काहीना काही शिकतच असतो. म्हणूनच या वर्षी जरा वेगळाच कार्यक्रम केला. या वर्षी वर्धिकांना तुम्ही शाखेत इतर वर्धिकांकडून काय शिकता, शिकलात अथवा असा कुठलाही प्रसंग की ज्यातून तुम्ही काहीतरी शिकलात त्याचे अनुभव सांगायला सांगितले. एकमेकांबद्दलचे अनुभव कथन करताना मुली भावनावश झाल्या होत्या. १० वीतील एक विद्यार्थिनी ८वीतील एका वर्धिकेबद्दल बोलताना चक्क रडली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या आजुबाजूच्या सामान्य व्यक्तींकडूनही खूप काही शिकण्यासारख असतं ही भावना दृढ झाली.

**रक्षाबंधन :-** या वर्षी रक्षाबंधनच्या दिवशी शाखेतील सर्व विद्यार्थी हरजीवन हॉस्पीटलमध्ये रूग्णांना राखी बांधावयास गेल्या. रूग्णांबरोबर इतर कर्मचारी वर्गालाही राख्या बांधण्यात आल्या.

**स्वातंत्र्यदिन :-** खेळांच्या स्पर्धा व त्यानंतर कु. विद्या कुडलिंगार हिने 'प्रार्थना कशासाठी?' व 'वर्धिनीच्या प्रार्थनेचा अर्थ' या विषयावर व्याख्यान दिले

**गणेशोत्सव :-** शाखेचे टिपरी पथक मंडळांसमोर खेळले तर मोठ्या मुलींच्या गटाने पथनाट्ये सादर केली.

**जनजागृती :-** दि. १ डिसेंबर या दिवशी एड्स विषयी जनजागृती करण्याचा संकल्प केला व दि. २९ डिसेंबर रोजी सुवर्णाताईचे एड्सवर व्याख्यान झाले.

### श्रीमंत हृदय ज्यांचे, रिते करून त्यांनी द्यावे

**शाखेत त्या दिवशी सहलीबद्दल चर्चा चाललेली होती. शाळेची इ. ८वी ची सहल अलिबागला जाणार होती. ८वीच्या एका विद्यार्थिनीला जाण्याची इच्छा असूनही आई पाठवत नव्हती, त्यामुळे ती जरा नाराजच होती. इ. १० वीच्या एका वर्धिकेला कळल्याबरोबर ती त्या मुलीच्या घरी गेली व आईला समजाऊन सांगू लागली; पण आईकडून तिला खरे कारण कळले की पैशाची अडचण आहे. हे ऐकल्या बरोबर त्या दहावीच्या वर्धिकेने स्वतःचे साठवलेले ८० रूपये तिला देऊ केले. ही १० वी तील विद्यार्थी फार श्रीमंत आहे असेही नाही आईबरोबर घरकामाला (लोकांच्या) मदत करणारी ही होतकरू विद्यार्थिनी; पण मनाचा मोठेपणा ओतप्रोत भरलेला. या प्रसंगी दत्ता हलसगीकरांच्या काव्यातील ओळींची आठवण झाली, 'श्रीमंत हृदय ज्यांचे, रिते करून त्यांनी द्यावे.'**



**मित्रा ! तू असा रडत का बसलास ? तुझ्यामधेच समस्त शक्ती वास करीत आहे. त्या प्रकट कर म्हणजे हे समस्त विश्व तुझ्या पायाशी लोळण घेईल.**



### स्पर्धा सहभाग

जीवनाचे रंगीत पंख म्हणजे स्पर्धा ! जीवनातील संघर्षाचा एक सुरम्य रियाझ म्हणजे स्पर्धा. स्पर्धा म्हणजे शाखेतील अनेक उपक्रमांचा एक प्रेरक घटक. आपले वर्धक शाखेतील, शाळेतील अनेक स्पर्धेत सहभागी होत असतात. अशाच, राज्यपातळीवरील दोरीच्या मल्लखांब स्पर्धेत सहभागी होण्याचा एक विलक्षण अनुभव 'राजमाता जिजाऊ' शाखेतील सात वर्धिकांनी घेतला. अनोळखी शहरात येऊन राज्यपातळीवर मल्लखांब खेळण्याची मुलींची ही पहिलीच वेळ. पण मुलींचा आत्मविश्वास व प्रामाणिक प्रयत्न हे कौतुकास्पद होते. जाताना रेल्वे प्रवासात मुलींशी मनमोकळया गप्पा झाल्या. कु. आशा बाठे हिचे आठवडयातून एकदा मिळणारे प्रशिक्षण व आठवडाभर त्याचा पाठपुरावा व सराव यांसाठी इ.८वीतील कु. वंदना चौधरी व पूनम खेरटकर यांचे खंबीर नेतृत्व हे नक्कीच नोंद घेण्यासारखे होते. प्रशिक्षक नसताना सर्व विद्यार्थिनींकडून व्यायाम करुन घेणे, त्यांचा सराव घेणे, त्यांना नव्या झापा शिकविणे, या सर्व गोष्टी वंदनानेच करुन घेतल्या. सरावाला मिळालेला मर्यादित वेळ व प्रशिक्षणाचा थोडा अभाव यामुळे मुलींना नवीन झापांचें प्रदर्शन करता आले नाही. उत्कृष्ट खेळी करता आली नसली, तरी राज्य पातळीवर येऊन खेळण्याचा एक आत्मविश्वास मुलींमध्ये नक्कीच जागृत झाला. परतीच्या प्रवासात मुली अधिकच मनमोकळेपणाने बोलत होत्या. 'ताई आपण आणखी खूप सराव करायला हवा, खूप नवीन झापा शिकायला हव्यात. संवादातून जाणवत होती ती त्यांची आत्मपरीक्षण करण्याची वृत्ती, वस्तुस्थिती स्वीकारण्याची मानसिकता. कुठल्याही प्रकारची व्यक्तिनिष्ठता न बाळगता संघ म्हणूनच विचार करण्याचा त्यांचा दृष्टिकोन. स्पर्धा म्हणजे केवळ चुरसच नव्हे तर, यशापयश उपभोगून समृध्द होण्याची मैफल. त्याचप्रमाणे 'इतरांच्या यशाला दाद देण्याचा संस्कार म्हणजे या स्पर्धा.'

## असाही एक संकल्प

दि. १७ सप्टेंबर हा हिंदी दिन म्हणून साजरा करतात. या वर्षी शाखेवर हिंदी दिना निमित्त असा संकल्प केला की 'हिंदी ही राष्ट्रभाषा आहे, त्यामुळे ती जास्तीत जास्त शिकण्याचा व बोलण्याचा आम्ही प्रयत्न करु'. काही उपक्रम हिंदीतूनच करावे, असा निश्चय केला. गुरुवार हा हिंदी दिन म्हणून पाळण्यात येतो. या दिवशी सारेच संभाषण हिंदीतून चालते. नाटयस्पर्धा, पद्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वर्धिनीचा परिचय सांगणे इ. स्पर्धा हिंदीतूनच होतात. हिंदी बोलताना होणारी कसरत, राष्ट्रभाषेबद्दल असलेल्या अज्ञानाची जाणीव करुन देते. वर्धिका प्रयत्नपूर्वक या स्पर्धांना प्रतिसाद देतात. आणि त्यामुळे हिंदी भाषेची तयारी चांगली होईल असा विश्वास वाटतो.


**एखाद्या महान ध्येयासाठी जीवनात एखादे उच्च ध्येय समोर ठेवून त्याच्यासाठी मरून जाणे हे कितीतरी चांगले आहे.**

## क्रीडाशिबिर

मुलींच्या शाखेचे हिवाळी शिबिर दि. ६ नोव्हेंबर २००१ ते १० नोव्हेंबर २००१ या कालावधीत 'बालेवाडी' येथे झाले. शिबिराचा विषय होता 'क्रीडा'. बालेवाडीसारखे भव्य क्रीडासंकुल पुण्यात आहे. तेथील मैदानावर खेळण्याची व खेळासाठी ज्यांनी पराकाष्टा केली आहे अशा दिग्गज क्रीडापटूंना जवळून पाहण्याची संधी मिळावी, या हेतूनेच बालेवाडी येथे शिबिर घेतले. शिबिरात खेळ विषयावर अनेक व्याख्याने झाली व काही खेळांचे प्रशिक्षणही दिले ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| **सूर्यनमस्कार** | **श्री. शरद गोडसे** |
| **खेळ कसे तयार होतात** | **श्री. राज चौधरी** |
| **शाखेतील खेळाचे महत्व** | **श्री. शिरिष पटवर्धन** |
| **खेळ, क्रीडा व लिला** | **श्री. विनायक बापट** |
| **जलतरण** | **प्रा. राघव अष्टेकर** |
| **व्यायामाचे महत्व** | **श्री. गोपाळ फडके** |
| **रामदास स्वामींचे महाराष्ट्र धर्म जागरण** | **श्री. ज्ञानेश पुरंदरे** |
| **छोटे-छोटे रंजक खेळ** | **श्री. पाठक** |

**या सर्व व्याख्यांनाबरोबरच थ्रोबॉल, बास्केटबॉल, व्हालीबॉल, डॉजबॉल या चार खेळांचे शास्त्रोक्त प्रशिक्षण श्री. जायभाय, श्री. जाधव, व श्री. बलकवडे या शिक्षकांकडून मिळाले. ॲथलेटिक्स मधील धावणे, गोळाफेक उंच उडी व लांब उडी या सर्व गोष्टींचे प्रशिक्षण**



**श्री. पाटील सरांकडून मिळाले. हे सर्व शिबिर यशस्वी होण्यामध्ये श्री. मिश्रा सरांचा सिंहाचा वाटा आहे.** मिश्रा सर हे क्रीडा संकुलाचे संचालक आहे. त्यांनी ही जागा उपलब्ध करुन दिली आणि त्यांच्या संकुलातील प्रशिक्षक व साहित्यही उपलब्ध करुन दिले. आजच्या जगातही चांगल्या कामाला प्रोत्साहन देणारे लोक आहेत हयाची प्रचिती मिळाली. या शिबिरात मुलींना बालेवाडी संकुल पूर्णपणे बघायला मिळाले. यामध्ये प्रामुख्याने सायकलचा वेलोड्रम, स्विमिंग टँक, जिम्नॅशियम हॉल, खो-खो व कबड्डीचे विस्तृत मैदान, बास्केटबॉल, फुटबॉल, हॅण्डबॉल, थ्रो-बॉल या खेळांची मैदाने कशी असतात ते बघायला मिळाले. तसेच राज्यपातळीवरील क्रीडापटूंना खेळताना बघायला मिळाले. शिबिराच्या समारोपाकरीता दीनानाथ रूग्णालय व संजीवन रूग्णालयाचे प्रमुख डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते. त्यांनी अत्यंत उद्बोधक व प्रेरक शब्दांमध्ये क्रीडाकौशल्याचा व्यक्तिगत जीवनात काय उपयोग होतो, हे उदाहरणे देऊन सांगितले.

### हसत-खेळत अभ्यास

१ जानेवारी म्हणजे नवीन वर्षाचा आरंभ. आपले वर्ष जरी गुढीपाडव्याला सुरु होत असले तरी व्यवहारी वर्ष हे १ जानेवारीलाच सुरु होते. नवीन संकल्पाला अथवा नवीन गोष्टी सुरु करण्यासाठी कुठलाही दिवस हा शुभच! म्हणूनच १ जानेवारी २००२ रोजी राजमाता जिजाऊ शाखा व आजोळ यांचे एकत्र शिबिर आयोजित केले. मुलींचे आगरकर हायस्कूल येथे

**मागे वळून पाहू नका, पुढे पाऊल टाका, पुढे पुढे चला ! अनंत बल, अनंत उत्साह, अनंत धैर्य, अनंत धीर हीच आपल्याला हवी आहेत.**

सकाळी १० ते रात्री ८ या वेळात हे शिबिर झाले . शिबिराचा विषय होता 'हसत-खेळत अभ्यास' या शिबिरात इतिहास व भूगोल विषयांचा अभ्यास व प्रश्नमंजुषा, इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन व काही रंजक खेळ, इंग्रजी वाचन स्पर्धा, अशा माध्यमातून विषय मुलींमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. या सर्व प्रयत्नांना विद्यार्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कारण शिबिराचा विषय जरी अभ्यास असला तरी, वातावरण खेळकर होते. एक आगळाच जल्लोष चालला होता आणि तरीही विद्यार्थी शिकत होते, तत्परतेने उत्तरं देत होते. एका वर्धिकेची प्रतिक्रिया फारच बोलकी आहे. ती म्हणाली, 'ताई या गोष्टी मी आधी शिकले होते पण तेव्हा एवढा आत्मविश्वास वाटत नव्हता, पण आजच्या स्पर्धेमुळे त्या गोष्टी जास्त चांगल्या समजल्या व आत्मविश्वासही निर्माण झाला आहे.'

अभ्यासाबरोबरच विरंगुळा म्हणून मध्ये फॅन्सी-ड्रेस व विविध-गुणदर्शन स्पर्धा झाल्या. नाताळच्या सुटीत दोन्ही शाखेत अनेक स्पर्धा झाल्या. नृत्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नाटय स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, चित्रकला, भेटकार्ड बनविणे. स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे देउन व स्पर्धांचे नेमके महत्व काय आहे, हे सांगून शिबिराचा समारोप झाला.

## गणेशोत्सवातील एक अनुभव

**गणपतीत रोज एक किंवा दोन मंडळांसमोर पथनाट्य आणि पोवाड्याचा कार्यक्रम होत असे. रास्ता पेठेतील एका मंडळासमोरही हा कार्यक्रम मुलींनी छान सादर केला. या मंडळाला आपले पथनाट्य इतके आवडले की, आमच्या मंडळासमोर तुम्ही पुन्हा एकदा कार्यक्रम करा असा आग्रह त्यांनी केला. त्यांच्या आग्रहास्तव पुन्हा त्या मंडळासमोर कार्यक्रम झाला.**

एकदा खेचरेमध्ये शाळेत तासिका सुरू असताना शाळेजवळ एक स्त्री सर्पदंशाने बेशुध्द झाली. तिला वर्धिनीच्या गाडीतून त्वरीत पौडला नेले व तेथील डॉ. पाटील व त्यांचे सहकारी यांच्या उपचारामुळे तिला जीवदान मिळाले. त्या स्त्रीच्या आग्रहावरून खेचरेमधील तिच्या घरी गेल्यावर खूपच जिव्हाळ्याने स्वागत झाले. इतरही मुलांच्या घरी आपुलकीने स्वागत झाले. काही घरी तर वर्धिनीच्या स्त्री कार्यकर्त्यांची खणा-नारळाने ओंटी भरली. जेवण्याचा खूप आग्रह झाला. तर त्या महिलेच्या घरी ५-६ किलो तांदूळ प्रेमापोटी दिला. सर्व घरी शिक्षणाचे महत्व कळले आहे व शिकणे किती आवश्यक आहे, याची जाणीव झाली आहे. हे या भेटींमध्ये जाणवले.

**ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाही ते नास्तिक होत असे प्राचीन धर्मांनी म्हटले आहे. नवा धर्म म्हणतो की ज्यांचा स्वतःवर विश्वास नाही ते नास्तिक होत**

## युवती विभाग :

या वर्षी ‘कु. विद्या कुडलिंगार’ हिची युवति प्रमुख म्हणून नियुक्ती झाली. विद्या ही तृतीय वर्ष B.E. (E&T.C)ची विद्यार्थिनी आहे.

या वर्षी युवती बैठकीत अनेक विषयांवर व्याख्याने व चर्चा झाल्या. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

श्री. मिलिंद मराठे यांची ‘कार्यकर्ता’ या विषयावरील ध्वनिफित ऐकवली. त्यावर सौ. माधवी पटवर्धन यांनी विश्लेषण केले.

श्री श्रीहर्ष सगरे यांनी ‘You Can Win’ या पुस्तकातील Self Esteem या विषयाचे वाचन करून त्यावर चर्चा घेतली.


‘आपली प्रकृती ओळखा, व स्वतःच स्वतःचे वैद्य व्हा’ या विषयावर श्री. विनेश नगरे ह्यांचे व्याख्यान झाले.

आग्रा शिखर परिषद व काश्मीर समस्या या विषयावरील श्री. इंद्रेशजी यांची ध्वनिफित ऐकून त्यावर चर्चा झाली.

‘सिमी’ वरील लेख वाचून त्यावर चर्चा झाली.

संगणक क्षेत्रातील मायक्रोसॉफ्टचा एकाधिकार व त्यावर उपाय या विषयावर श्री. अरूण कुलकर्णी ह्यांचे व्याख्यान झाले.

‘बस्तरची समस्या व आव्हान’ यावर डॉ. राम गोडबोले यांच्याशी गप्पागोष्टी झाल्या.



**अभ्यासवर्ग**

दि. २७ जुलै २००१ ते २९ जुलै २००१ या कालावधीत ॲग्रिकल्चर कॉलेज येथे युवति शिबिर झाले. या शिबिरात खालीलप्रमाणे सत्रं झाली.

**स्त्री : कालची-आजची-उद्याची : सौ. शैला जोशी**

**कार्यकर्ता : परस्पर-पूरकता : श्री संजय तांबट**

**संवाद : सौ. रंजना आपटे**

**ऐपीजे अब्दुल कलाम : श्री. अजिंक्य कुलकर्णी**

**कार्यकर्ता व्यवहार : श्री. प्रमोद कुलकर्णी**

**‘स्व’-रूपवर्धिनी कशासाठी? : श्री. शिरिष पटवर्धन**

**योजना कौशल्य : सौ. माधवी पटवर्धन**

**उत्तमतेची कास धरू : श्री. सुभाषराव देशपांडे**

**‘देहबोली’- संवादाचे प्रभावी माध्यम : सौ. अंजली पेंडसे**

शिबिराचा समारोप राजमाता जिजाऊ शाखेचे पालक श्री. अविनाश जोशी यांनी केला.

## स्वामी अखंडानंद शाखा :

या वर्षी शाखेत अनेक नवीन उपक्रम कार्यक्रम व घटना झाल्या, त्याचा वृत्तांत -

**मकर संक्रांत**

यावर्षी संक्रांतीच्या कार्यक्रमाला शाखेने जाळातील उड्या, जळत्या बोथाट्या तसेच आगीवरून चालणे इ. प्रात्यक्षिके बसविली होती. फेब्रुवारी महिन्यात नामवंत डॉक्टरांकडून वर्धकांची मोफत वैद्यकीय तपासणी झाली.

**गुरूपौर्णिमा :** गुरूपौर्णिमेला प्रत्येक इयत्तीच्या वर्धकांनी शिक्षकांच्या घरी जाऊन कार्यक्रम केला.

**सहल :**

मे महिन्याच्या सुटीत शाखेची सहल

बल हेच जीवन होय, दुर्बलता म्हणजे मृत्यू. बल हाच परम आनंद होय, शाश्वत व अमर जीवन होय.

भाज्याची लेणी आणि विसापूर-लोहगड येथे गेली होती. सर्व मुलांनी हा ट्रेक आनंदात व उत्साहात पार पाडला. दिवाळीच्या सुटीत खूप पायपीट घडवणारा व अत्यंत अवघड असा 'ढाक भैरी' हा ट्रेकही मुलांनी न थकता, न घाबरता पूर्ण केला.

**वर्धापन दिन :** १२ ऑक्टोबरला शाखेचा वर्धापन दिन साजरा झाला. पालकांनाही निमंत्रण दिले होते. कार्यक्रमाला एकूण उपस्थिती १५० होती. प्रमुख पाहुणे श्री. सुहासराव काणे होते. त्यांनी 'शाखाकार्यात पालकांची व वर्धकांची भूमिका' या विषयावर आपले विचार मांडले. ते सर्वांनाच भावले. या प्रमुख भाषणापूर्वी युवकांनी 'हे वीर विवेकानंद' हे पद्य म्हटले


**विज्ञान प्रकल्प स्पर्धा :-** रामकृष्ण शाखेवर विज्ञान दिनानिमित्त झालेल्या विज्ञान प्रकल्प स्पर्धेत शाखेतील वर्धक चमकले. 'प्रकाश अदृश्य आहे' या इयत्ता ९वीच्या वर्धकांनी मांडलेल्या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. तर 'बायोगॅस संयंत्र' या इयत्ता १०वीतील वर्धकांच्या प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला.

**निबंध स्पर्धा :** शाखेत वर्षभरात तीन वेळा निबंध स्पर्धा झाली. त्यातील विषय खालीलप्रमाणे होते. १) विज्ञान शाप की वरदान २) दहशतवाद ३) मी शाखाप्रमुख झालो तर ... ४) माझा भारत महान

**व्याख्याने**

| | विषय | वक्त्याचे नाव |
|---|---|---|
| १) | वाचन व इंग्रजी संभाषण | डॉ. देवपूरकर |
| २) | कुडतोजी गुजर - चरित्र | श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| ३) | अरूणाचल प्रदेश स्लाईड शो व माहिती | सौ. बागेश्री पोंक्षे |
| ४) | पर्यावरण | श्री. वामन पळनीटकर |
| ५) | परीक्षेच्या काळात अभ्यास कसा करावा ? | श्री. प्रदीप आगाशे |
| ६) | सुंदर हस्ताक्षर | श्री. नाना लाभे. |
| ७) | महात्मा गांधी चरित्र | श्री. दि. दा. जोशी |
| ८) | वऱ्हाड निघालंय लंडनला (एकपात्री प्रयोग) | राम इंचुरे |

एक दिवस मुलांना शाखेत पु. ल. देशपांडे यांची 'म्हैस' ही लोकप्रिय कथा ऐकवण्यात आली.



**सरावपरीक्षा :-** शाळेच्या सहामाही व वार्षिक परीक्षेच्या आधी वर्धकांच्या सराव परीक्षा घेण्यात आल्या.

लहानपणापासूनच रचनात्मक, शक्तिदायी व साहाय्यक विचारांना तुमच्या मेंदूत प्रवेश करु द्या.

कारगिल युध्दानंतर शाखेमार्फत सैनिकांना पत्र पाठवण्यात आले. त्यातूनच शाखेतील सागर व विशाल शेंडे या वर्धकांचा पत्रव्यवहार नियमित चालू आहे. त्या सैनिकाचे त्यांच्याशी घरातील एका सदस्याप्रमाणेच संबंध आहेत. यापैकी एका सैनिकाने घरी येण्याचेही मान्य केले आहे.



**स्वामी अभेदानंद शाखा :**


**मैदान** - सर्व प्रकारचे खेळ झाले. समतेचा सराव नियमितपणे कमी झाला. पदविन्यासाचा अभ्यास घेतला. दिवाळीच्या सुटीत कबड्डी, लंगडी, फुटबॉल, रनराऊंडस्, डॉजवॉल अशा खेळांच्या स्पर्धांचे आयोजन केले होते.

**संपर्क** - सर्व घरे जवळ असल्याने संपर्क भरपूर झाला. संपर्कातील अनुभव फार चांगले आहेत. पालकांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला. यातील काही अनुभव पुढीलप्रमाणे-

१) एका वर्धकाला काही कारणास्तव वर्धिनीत येऊ नको असे सांगितले, तेव्हा त्याचे वडिल शाखेत आले. डोळयांत पाणी आणून त्यांनी आपल्या मुलाला पुन्हा शाखेत घेण्याची विनंती केली. तसेच त्याच्या चांगल्या वागणुकीची जबाबदारी घेतली. सध्या तो वर्धक अतिशय उत्तम प्रकारे वागत आहे. शाखेची ओढ उत्पन्न झाल्यावर स्वतःमध्ये बदल कसा घडू शकतो, याचेच उदाहरण म्हणजे हा विद्यार्थी आहे.

२) एका वर्धकाच्या घरी अगदी आदल्या रात्री विचारले होते की, शाखेतल्या मुलांसाठी तुम्ही उद्या सकाळी पूरक आहार देऊ शकाल का? त्या पालकांनीही शाखेवरील प्रेमामुळे ऐनवेळेला सांगूनही पूरक आहाराची व्यवस्था केली.

३) शाखेत दर रविवारी पूरक आहार दिला जातो. एका पालकसभेत पालकांनी उत्स्फूर्तपणे 'आम्ही एकेका रविवारी पूरक आहार देऊ, वर्धिनीच्या कार्यात आम्हालाही सहभागी व्हायचे आहे', असे उत्स्फूर्तपणे सांगितले. यानंतर किमान ९ ते १० पालकांनी पूरक आहाराची व्यवस्था एकेका रविवारी सांभाळली.



**या जगातील समस्त दुःखाचे कारण म्हणजे दुर्बलता हेच होय. आपण शक्तिहीन आहोत म्हणूनच आपल्याला दुःख भोगावे लागते.**

**पालकसभा :** वर्षभरात एकूण चार पालकसभा झाल्या. पालकांनी सर्व माहिती नीट ऐकून घेतली. सर्व पालक युवकांना ओळखतात. पालकांच्या तक्रारींचे प्रमाण हळूहळू कमी झाल्याचे दिसून आले.

**तासिका :** बहुतांश तासिका युवकांनीच घेतल्या, तर काही तासिका पालकांनीही घेतल्या. एका युवकाच्या दोन बहिणी तासिका घेतात. वर्धकाच्या माध्यमातून घरही कसे कामाला जोडले जाते, याचेच हे उदाहरण आहे. वर्धकांची संख्या मर्यादित असल्याने प्रत्येक वर्धकावर वैयक्तिक लक्ष दिले गेले. तसेच गणित, इंग्रजी, शास्त्र या विषयांशिवाय वर्धकांना जे अन्य विषय अवघड वाटतात, त्या विषयांचेही मार्गदर्शन देणे शक्य झाले.

४) **कार्यक्रम :** वर्षात भरपूर कार्यक्रम झाले. शाखेतील युवकांनीच तयारी करून मुलांसमोर काही विषय मांडले. दिवाळीच्या सुटीत पुढील कार्यक्रम झाले

चांदणी भोजन, शक्तिबुध्दी स्पर्धा, अभिरूप न्यायालय, पालकसभा, प्रश्नमंजुषा, पद्यस्पर्धा/प्रसंगनाट्य, खजिना शोध, आदर्श ग्रामरचना

वरील कार्यक्रमांमुळे सुटीच्या दिवसांतही शाखा उत्तम चालत होती. कोणीही गावाला गेले नाही. **खजिनाशोध या स्पर्धेतील शेवटची चिठ्ठी शाखेत न येणाऱ्या वर्धकांच्या घरी मुद्दाम नेऊन ठेवली होती. त्यानिमित्ताने त्यांच्या घरी वर्धकांनी संपर्क केला व याचा परिणाम म्हणजे सहा वर्धक पुनः नियमितपणे शाखेत येऊ लागले**

**सहल :** भेडशाची लेणी या ठिकाणी गेली होती.

**विशेष घटना / प्रसंग**

१) मानसिक विकास बैठक नियमित होत होती. चार्ली चाप्लीनचे चरित्र असा विषय आधीच जाहीर केला होता. त्यावेळी न बोलावताही संपूर्ण लहान गट उपस्थित होता.

२) हवामान खात्याला भेट दिली. तेथील कर्मचाऱ्यांनी हवामान खात्यातील विविध उपकरणांची माहिती दिली. तसेच वर्धिनीची माहिती उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून जाणून घेतली.

३) शाखेत रोज अर्धा तास विविध कार्यक्रम घेतले जातात. यामध्ये खालील विषयांचा समावेश आहे -

वक्तृत्व विकसन, पद्यसराव, सद्यस्थितीवर चर्चा, चित्रकला, इंग्रजी व्याकरण, अभ्यासपूरक कौशल्ये, इत्यादि.

**आपण दुर्बल आहोत म्हणूनच आपण मृत्यूमुखी पडतो. जिथे दुर्बल बनवणारी कोणतीच गोष्ट नाही तिथे मृत्यू कुठचा ? दुःख कुठचे ?**

४) **ज्योत से ज्योत जलाते चलो** - विशाल शेरकर हा बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थी. आपल्या कार्यकर्त्यांनी त्याला वर्धिनीच्या कामाची माहिती दिली. त्यानंतर लगेचच त्याने शाखेत यायला सुरूवात केली. तो आता इ. ८वीला इंग्रजी शिकवितो. तसेच इतर अनेक उपक्रमांमध्ये सक्रीय सहभागी घेतो.

५) युवराज दिघे या वर्धकाचा राज्यस्तरीय प्रश्नमंजुषेत तृतीय क्रमांक आला.

६) जागेच्या अडचणीमुळे शाखा काही दिवस शनिमंदिर येथे भरत असे. एकदा तेथील नागरिकांनी आपणहून वर्धकांचे कौतुक केले व सर्वांना पाणी व पूरक आहार दिला.

**मिलिंद वरखेडकर या युवकाने गणेशोत्सवाच्या काळात सुयोग मित्र मंडळाच्या ‘हुतात्मा भगतसिंग’ यांच्या जीवनावर आधरित जिवंत देखाव्यात जेलरची भूमिका साकार केली होती. अनेकांनी त्यांचे कौतुक केले. तसेच लोकसत्ता माणिकचंद गणेशदर्शन स्पर्धेत मंडळाचा द्वितीय क्रमांक आला.**

## स्वामी सुबोधानंद शाखा :

**कार्यक्रम विभाग :** वर्षाच्या सुरूवातीपासूनच विविध कार्यक्रमांना सुरवात झाली. इयत्ताशः कार्यक्रम घेण्यात आले. मुलांनी अतिशय उत्कृष्ट आणि नावीन्यपूर्ण कार्यक्रम सादर केले. ते खालीलप्रमाणे -

शिवजयंती-**५वी**, हेडगेवारजयंती-**६वी**, लाला लजपतराय जयंती-**७वी**, सुभाषचंद्र बोस जयंती-**८वी**, विवेकानंद जयंती-**९वी**

दर चौथ्या रविवारी मानसिक विकास बैठक मंदिरात घेतली जात होती. सकाळी दर्शनाला येणारे नागरिक शाखेबद्दल कुतुहलाने माहिती घेत होते.

**व्याख्याने :** वर्धकांना किमान माहिती मिळाली पाहिजे, त्यांची जाणून घेण्याची उत्कंठा वाढली पाहिजे या हेतूने अनेक विषयांवर व्याख्याने घेण्यात आली त्यातील काही खालीलप्रमाणे -

| वक्ते | विषय |
|---|---|
| श्री. पु. ग. वैद्य | अभ्यास कसा करावा. |
| श्री. संदिप मोरे | ओळख रा. स्व. संघाची |
| डॉ. पुणतांबेकर | विज्ञानातील गमतीजमती |
| सौ. अंजली बापट | ओळख उपग्रहांची (स्लाईड शो) |
| श्री. शैलेश महाजन | जागतिक दहशतवाद |
| श्री. शिरीष पटवर्धन | भारतातील आतंकवाद |
| सौ. बागेश्री पोंक्षे | पूर्वांचलचे जनजीवन (स्लाईड शो) |
| सौ. अनघा पाटणकर | बहारिन देश |
| डॉ. यशवंत केळकर | बालआहारशास्त्र |
| डॉ. श्रीराम लागू | चित्रपटसृष्टीतील माझे अनुभव |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | शिवचरित्र |
| श्री. चैतन्य भारंबे | परीक्षा मार्गदर्शन |



उठा, धीट बना, शक्तिसंपन्न बना. तुम्ही सगळी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्या आणि जाणून असा की तुम्हीच आपल्या भाग्याचे निर्माते आहात.

**अन्य उपक्रम :** दिवाळीत मुलांना त्यांचे कौशल्य दाखवायला वाव मिळावा म्हणून अनेक स्पर्धात्मक कार्यक्रम राबवण्यात आले. त्यात पाककला स्पर्धा, किल्ले स्पर्धा इत्यादि ठेवण्यात आल्या. सर्व स्पर्धात मुलांनी उदंड उत्साहाने भाग घेतला. आपली जिद्द, चिकाटी कौशल्य, मेहनत दाखवत अनेक स्पर्धांत गुण मिळवले. तसेच "विमान पडते आहे" अभिरूप न्यायालय, मूकनाट्य, इ. कार्यक्रम घेण्यात आले. त्यामुळे मुलांना त्यांचे सुप्त गुण दाखविण्याची संधीही मिळाली.

प्रार्थना झाल्यावर युवक आळीपाळीने एक बोधकथा सांगत त्यामुळे त्यांचाही सभाधीटपणा वाढला. मुलेसुध्दा बातम्या, सुविचार, ऐतिहासिक दिनविशेष आणि विज्ञान दिनविशेष सांगत. या उपक्रमामुळे मुले वर्तमानपत्र नियमित वाचू लागली आहेत. तसेच बातम्यासुध्दा पाहू लागली आहेत.

निलेश पारीख याने मुलांकडून संस्कृत श्लोक पाठ करून घेतले गेले. तसेच त्यांचा अर्थसुध्दा समजावून सांगितला. त्याचा उपयोग मुलांना निबंध लिहिताना नक्कीच होणार आहे.

**तासिका विभाग :** ५वी, ६वीचे तास युवक घेत, मात्र ८वी ९वी मधील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी बाहेरून शिक्षक येत होते. शिक्षकांकडे संपर्क ठेवण्यात येत होता. मुलांच्या प्रगतीबाबत विचारविनिमय होत असे. मुलांचे गुण पाहून, त्यांच्या पालकांच्या भेटी घेऊन पाल्यांच्या अभ्यासाविषयी चर्चा केली जात होती.

**सहली :** यावर्षी गटानुसार दोन सहली झाल्या. त्यात लहान गटाची सहल नीलकंठेश्वरला झाली. सहल अतिशय उत्कृष्ट अशी झाली. जणू स्वर्गातच गेल्यासारखे जाणवत होते. तेथील पुजाऱ्यांनी १५ मिनिटे ध्यान करायला सांगितले. त्या शांत प्रसन्न वातावरणात 'ॐ नमः शिवाय' हा जप केल्यावर अतिशय प्रसन्न वाटले. नंतर त्यांनी आम्हाला मंदिराचा इतिहास सांगितला. तसेच श्री. सर्जेमामांविषयी माहिती सांगितली. आम्हीही त्यांना 'स्व-'रूपवर्धिनीची माहिती सांगितली.



मोठ्या गटाची सहल लोहगडला गेली होती. नियोजन किती करावे लागते, किती अडचणी येऊ शकतात, त्याच्यावर कशा प्रकारे मात करावी लागते, हे या सहलीच्या निमित्ताने शिकायला मिळाले.

**मैदान विभाग :** प्रशिक्षण व नियोजन यावर भर हे या वर्षीचे वैशिष्ट्य म्हणता येईल. प्रत्येक वर्धक किमान ५० जोर मारू शकेल, अशी क्षमता आहे. दर शनिवारी समता कटाक्षाने होत आहे. तसेच मुलांना शाखा नीट भरवता यावी, आज्ञा नीट देता याव्यात याचेही प्रशिक्षण नियमितपणे देण्यात आले. मुलांमध्ये व्यायामाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून अनेक विशेष प्रयोग करण्यात आले, युक्त्या योजल्या. त्यायोगे व्यायाम हसत खेळत

**दुर्बलतेचेच सतत चिंतन करीत बसणे हा काही दुर्बलता दूर करण्याचा उपाय नाही; बलाचा नेहमी विचार करणे हाच उपाय आहे.**

व्हायला लागला असा अनुभव आहे. आठवड्याचे खेळ विभागाचे नियोजन पत्रक केल्यामुळे मुले आधीच मैदान आखणी करू लागली. दिवाळीच्या सुटीमध्ये अनेक मैदानी स्पर्धा घेतल्या. त्यामुळे आपापल्या गटाचे गुण वाढावेत म्हणून जो तो आपले कौशल्य पणाला लावत होता. एक प्रकारची चुरस निर्माण होऊन स्पर्धा कधी संपल्या, दिवस कसे संपले हे कोणालाच समजले नाही. दिवाळीची सुटी अजून जास्त असती तर किती मजा आली असती, अशी प्रतिक्रिया वर्धकांकडून ऐकायला मिळत होती.

**संपर्क विभाग :** या वर्षी संपर्क रचना वर्गशः होती. त्यानुसार वर्गशिक्षकांनीच मुलांची दैनंदिनी निश्चित केली होती. मुलांची दैनंदिनी या वर्गशिक्षकांनीच तपासावी, मुलांचा अभ्यास आणि इतर गोष्टी समजून आवश्यकतेनुसार घरी संपर्क करावा, मुलांच्या अडी अडचणी समजून त्यांना योग्य मार्गदर्शन करावे, असे ठरविले होते. त्यानुसार यावर्षी संपर्क केला. संपर्क करताना अनेक अनुभव आले. काही घरी चांगले अनुभव यायचे तर काही घरी पालकांचे मुलांकडे कमी लक्ष असलेले जाणवायचे.

एका मुलाच्या घरी वाढदिवसाच्या दिवशी संपर्क केला. तेव्हा घरच्यांनाच त्यांचा मुलाचा वाढदिवस आहे हे माहिती नव्हते. आपण वाढदिवस कसा साजरा करतो व का साजरा करतो, हे त्यांना सांगितल्यावर त्यांना फारच कौतुक वाटले.




काही मुलांची घरे शाखेपासून फार लांब अंतरावर आहेत, तरी ते नियमित येतात, ह्याचे फारच कौतुक वाटते. काही पालक तक्रारीबरोबरच मुलांमधील बदलही आवर्जून सांगतात. अनेक चांगल्या सवयी त्यांना लागल्या, तसेच त्याचे वागणे बोलणेही सुधारले, असे जेव्हा ते सांगतात तेव्हा जे समाधान मिळते, ते पुढील कामासाठी आम्हांला सतत प्रेरणा देत राहते.

यावर्षी आणखी एक अभिनव प्रकल्प सुरू केला आहे. प्रत्येक आठवड्याला आदर्श गट, आदर्श वर्धक, आरोग्यदायी वर्धक यासाठी गुण देऊन क्रमांक ठरवण्यात येत. त्यामुळे मुले नियमित येऊ लागली आणि आपला क्रमांक यावा यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू लागली आहेत.

**मानसिक विकास बैठक :-** यावर्षी दोन वेळा ही बैठक ओंकारेश्वरला, तर इतर वेळी शाखेच्या आवारातच घेण्यात आली.

लहान गटाची व मोठया गटाची वेगवेगळी बैठक घेण्यात आली. विषयांचे स्वरूप आणि मुलांचा वयोगट लक्षात घेऊन व्यवस्था करण्यात आली. या सर्व बैठकांमध्ये अनेक वेगवेगळया विषयांची चर्चा झाली. रामदासांच्या बोधकथा, दहशतवादाची ओळख आणि भयानकता ( शैलेश महाजन), माझ्या आवडत्या गोष्टी, प्रतिज्ञा, 'दहशतवाद' ( शिरीष पटवर्धन) , भारताची आर्थिक विषमता, गांधीजींच्या गोष्टी अशा अनेक विषयांवर चर्चा व उद्‌बोधन या बैठकींमध्ये झाले.

**या जगात म्हणा किंवा धर्मजगतात म्हणा, हेच सत्य आहे की भय हेच अधःपतनाचे व पापाचे निश्चित कारण आहे.**

**गणेशोत्सव-सांस्कृतिक कार्यक्रम :-** 'स्वदेशी' या विषयावर आधारलेलं १५-२० मिनिटांचे नाटक शाखेतील वर्धक व युवकांच्या सहभागाने अनेक मंडाळासमोर सादर करण्यात आले. कर्वेनगर, कोथरुड, माळवाडी अशा वेगवेगळया भागात हे नाटक सादर झाले. अशा विषयाचे सादरीकरण सर्व मंडळांना नवीनच होते.'मंडळात होणारे कार्यक्रम अशा प्रकारचेही (सांस्कृतिक) असू शकतात याची जाणीव त्यांना यानिमित्ताने झाली'. धांगडधिंगा आणि कर्कश्य आवाजापेक्षा विशिष्ट उद्देशाने केलेले हे नाटक अधिक परिणामकारक ठरले. मंडळांकडून मिळालेल्या प्रतिसादातून हे प्रामुख्याने जाणवले.

## भेट प्रतिभाप्रांतीच्या अतिथीची

*ख्यातनाम चित्रपट व नाटय अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या अनुभवकथनाचा एक अनौपचारिक कार्यक्रम सुबोधानंद शाखेने आयोजित केला होता. ज्यांच्या समर्थ अभिनय कौशल्याचे दर्शन विविध चित्रपटांमधून बघायला मिळाले, ते व्यक्तिमत्व प्रत्यक्ष आपल्या शाखेवर येणार या कल्पनेने विद्यार्थी व कार्यकर्ते उत्सुकतेने त्यांची वाट पहात होते. डॉ. लागू यांच्या आगमनातूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाची प्रचीती सर्वांनाच आली. कार्यक्रमाच्या ठरलेल्या वेळेच्या आधीच ५-१० मिनिटे डॉ. लागूंचे आगमन झाले. कोणत्याही औपचारिक स्वागतात न अडकता ते कार्यकर्त्यांना म्हणाले, 'आपली कार्यक्रमाची वेळ झाली आहे. कार्यक्रम वेळेवरच सुरु व्हायला हवा; चला कार्यक्रमाच्या ठिकाणीच जाऊ या.' चार मजले वेगाने चढून जाऊन ते सभागृहात ठरल्या वेळेला पोहोचले आणि कार्यक्रम सुरु झाला. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजाभाऊ लवळेकर यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना वर्धिनीच्या कामाचा परिचय आपल्या प्रास्ताविकातून करुन दिला. त्यानंतर सुमारे दीडतास डॉ. श्रीराम लागू यांनी आपले अभिनय क्षेत्रातील अनुभव मुलांसमोर ठेवले. युवक आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची मोकळेपणाने उत्तरे दिली.चित्रपटांपेक्षा नाटकांमध्ये काम करताना अभिनयाचा कस कसा लागतो हेही त्यांनी सांगितले आणि डॉक्टरी पेशापेक्षा अभिनय क्षेत्राला आपण प्राधान्य का दिले याविषयीची आपली भूमिका विशद केली. कै. व्ही. शांताराम, कै. भालजी पेंढारकर यांच्यासारख्या दिग्गज दिग्दर्शकांच्या हाताखाली काम करताना आपल्या व्यक्तिमत्वाचे पैलू कसे घडत गेले, त्यांच्या शिस्तशीर वर्तणुकीचा आपल्यावर कायमचा ठसा कसा उमटला, हे त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले. मराठी चित्रपट सृष्टीच्या घसरत चाललेल्या दर्जाविषयी त्यांना वाटणारी खंतही त्यांनी व्यक्त केली. आयुष्यात काही ध्येय गाठायचे असेल तर कसे परिश्रम करावे लागतात, हे त्यांच्या बोलण्यातून प्रामुख्याने जाणवत होते.*

**आज आपल्या देशाला लोखंडी स्नायूंची आणि पोलादी मज्जातंतूंची खरी गरज आहे.**

# पावसाळी सहल

पावसाळा सुरू झाला की चाहूल लागते ती सहलीची. पावसाची रिमझिम. नुकतेच डोके वर काढलेली लवलवती गवतांची पाती. हिरवीगार झालेली सृष्टी व डोंगर माथ्यावरून झुळझुळ वाहणारे झरे. अशा वातावरणात सहलीला न जाणे म्हणजे निसर्गाच्या आस्वादालाच मुकणे होय.

दि. १६ जून २००९ रोजी युवतींची सहल योजली होती. सहलीचा टप्पा होता केळद ते शिवथरघळ. दिनांक १६ला दुपारीच्या एसटीने एकूण १५ युवती केळदला निघाल्या. ही एकमेव निवासी एस.टी. होती, जी केळद या गावी जाते. संध्याकाळी आम्ही केळदला पोहचलो. केळद हे गाव वेल्हे तालुक्याच्या सीमेवर व उंचावर आहे. गावात पोहचल्याबरोबर आम्ही आमचे सामान तेथील मंदिरात ठेवले. एव्हाना एस.टी. चालक आमच्या चांगल्याच परिचयाचे झाले होते. त्यांनी कोठून तरी ताजे फणस तोडून आणले होते. सगळ्या युवति फणसाच्या गऱ्यांवर तुटून पडल्या. एवढा ताजा रसरशीत फणस म्हणजे एक मेजवानीच होती. फणसाची ती अवीट गोडी अजूनही जीभेवर रेंगाळत आहे. गावकरीही आता आपले झाले होते. एका घरात आम्ही चुलीवर स्वयंपाक केला व देवळात मेणबत्तीच्या मंद प्रकाशात जेवण केले. हा अनुभव विलक्षणच होता.

दुसऱ्या दिवशी सकाळचे सात वाजता केळद गावातून शिवथरघळीकडे निघालो. भरपूर पाऊस. सोसाट्याचा वारा आणि धुकं यामुळे रस्ता दिसत नव्हता. रस्ता दिसत नसला तरी लक्ष्य निश्चित होते. त्यामुळे सर्व युवतींची पावलं झपाझप पडत होती. शिवथरघळच्या दिशेने केळदवरून डोंगर उतरून (नाळीतून) जाणारी पहिली वाट सोपी होती; पण धुकं, सोसाट्याचा वारा व पाऊस त्यामुळे कुणाचेही पाऊल स्थिर पडत नव्हते. शरीराचे संतुलन टिकू शकत नव्हते. सगळेजण त्या क्षणी आहे त्या स्थितीत दगडांवर हात टेकून, आधार घेऊन, स्तब्ध उभे राहात. पुन्हा एकदा, निसर्गापुढे मानवाला नतमस्तक व्हावेच लागते ह्याची प्रखर जाणीव झाली. पण चालायला हवेच होते. थांबून थोडेच चालणार होते!

डोंगरमाथ्यावरून खाली आल्यावर आम्ही कोकणात प्रवेश केलेला होता. आता मात्र वाट अतिशय सुरेख होती.

दोन्ही बाजूंनी करवंदाची जाळी. या जाळीतील करवंदांचा आस्वाद घेत घेत आम्ही चालत होतो.

एका बाजुने डोंगर, पावलो-पावली कोसळणारे धबधबे. एका बाजूला भाताची शेती. काही टुमदार घरं. मध्ये-मध्ये शेतात काम करणारे शेतकरी बंधु. प्रत्येक टप्प्यावर हे निसर्गरम्य दृश्य डोळ्यांत साठवत आम्ही चालत होतो. तहानभूक विसरून आमचा प्रवास

**आतापर्यंत आपण पुष्कळ रडलो; पुरे आता ते रडणे. आता स्वतःच्या पायावर उभे राहून 'मनुष्य' बना.**

चालला होता. निसर्गाच्या कुशीतील हा रमणीय प्रवास कधी संपला ते कळलेच नाही आणि अखेर आम्ही शिवथरघळीत पोचलो.


घळीत गेलो. ‘रामदास स्वामींचे’ दर्शन घेतले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर ‘धबाबा चालल्या धारा, धबाबा तोय आदळे’ ची अनुभूती घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. डोळयासमोर सतत सरसरत होत्या पावसाच्या सरी, धुक्यानं वेढलेली हिरवी रानं, डोंगर वाटा आणि फणसाचे गरे अन् करवंद!

# संक्रांत उत्सव

शाखा विभागाचा मकरसंक्रमण उत्सव रविवार दिनांक २१ जानेवारी रोजी भारत इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री. शरदराव दांडेकर’ व प्रमुख वक्ते म्हणून वर्धिनीचेच कार्याध्यक्ष मा. राजाभाऊ लवळेकर’ यांचे मार्गदर्शन लाभले होते. मैदानी प्रात्याक्षिकांना उठाव देणारी नेपथ्य रचना सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. रंगमंचावरील पडद्यावर विविध शस्त्रात्रे चकाकत होती.
‘मनामनातील दुवा साधण्या, संघटना हे एकच साधन’ हे पद्याचे बोल प्रात्याक्षिकांची भूमिका अधिक स्पष्ट करत होते. पालकवर्ग व हितचिंतकांनी आवार फुललेले होते. अतिथींना मानवंदना व ओंकार पूजन झाल्यावर बहारदार कार्यक्रमांना सुरूवात झाली.
यावर्षी खालील प्रात्याक्षिके सादर करण्यात आली.

| शाखा | प्रात्याक्षिक |
|---|---|
| सुबोधानंद | लहान गट - योगासने |
| | मोठा गट - त्वायक्वोंदो |
| योगानंद | लाठीकाठी, बोथाटी |
| | व्यायामप्रकार व हल्लाफोड |
| राजमाता जिजाऊ व भगिनी निवेदिता | एरोबिक्स |
| विवेकानंद | वेत्रचर्म व तलवार द्वंद्व |
| रामकृष्ण | युध्दाची बदलती तंत्रे |
| अभेदानंद | दीपव्यायाम योग |
| अखंडानंद | अग्नीगोलातील उड्या व जाळातून चालणे |
| आजोळ | शाखेतील गमतीदार खेळ |


यानंतर व्यासपीठावरील कार्यक्रमाला सुरूवात झाली. विवेकानंद शाखेच्या युवक-वर्धकांनी टाईम मशिनच्या रूपकाचा वापर करून नाट्य रूपाने वर्धिनीचे कार्यवृत्त सादर केले. स्वामी अखंडानंद शाखेच्या शिक्षिका सौ. सुमंतबाई यांनी न राहवून उत्स्फूर्तपणे वर्धक व कार्यकर्त्यांचे कौतुक केले. प्रमुख अतिथी श्री. दांडेकर यांनी वर्धकांचे कौतुक केले आणि स्वरूपवर्धिनीच्या कार्यवाढीला शुभेच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते वर्धिनीचे संस्थापक सदस्य श्री. कांचनभाई शहा यांचा ‘मावळ भूषण पुरस्कार’ जाहीर झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला, तसेच पी. एम. टी. मधील एक चालक श्री. बारणे यांचा प्रामाणिक वाहक म्हणून गौरव करण्यात आला. आपल्या प्रमुख मार्गदर्शनात माननीय राजाभाऊ लवळेकर सरांनी वर्धिनीच्या कार्यामागील मूळ कल्पना व त्यातून जागृत होणाऱ्या प्रेरणादायी विचारांचे अलौकीकत्व यांचा वेध घेतला. संक्रातीच्या पर्वातील स्नेह व उर्जा यांची गोड भेट देणारा असा हा वार्षिक समारंभ शेवटपर्यंत रंगला.



**स्वतःच्या विकास करा. ध्यानात ठेवा की, गती आणि वाढ हीच केवळ जिवंतपणाची लक्षणे होत.**

## वीर अभिमन्यू बालशाखा :

**शिबिरे :-** उन्हाळी शिबिर १ ते ६ मे या कालावधीत अपंग कल्याणकारी केंद्र, वानवडी येथ झाले. कथाकथन असा या शिबिराचा विषय होता. स्वातीताई, ज्ञानेश पुरंदरे, शिरीष पटवर्धन, दि.दा.जोशी इ. वक्त्यांनी सांगितलेल्या मजेदार गोष्टींमध्ये मुलं अगदी रमून गेली होती. हे शिबिर अपंग मुलांच्या निवासी शाळेत घेतले होते. अपंग मुलांची जिद्द कशी असते, याचे दर्शन यानिमित्ताने शिबिरार्थी मुलांना झाले. दिवाळी शिबिर साळुंब्रे या गावातील ज्ञानप्रबोधिनीच्या ग्रामप्रबोधिनी शाळेत झाले. ‘निसर्गाच्या सहवासात’ असा या शिबिराचा विषय होता. त्यामुळे गावात, शेतात, नदीवर मनमुराद बागडण्याची तसेच शेतात काम करून शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचा अनुभव घेण्याची संधी मुलांना या शिबिरात मिळाली. ग्रामप्रबोधिनी शाळेतील कार्यकर्त्यांनी मुलांना तेथील गांडुळखत प्रकल्प, मधुमक्षिका पालन प्रकल्प दाखविला व त्याची माहिती दिली. याच शाळेतील एक शिक्षक श्री. करमरकर यांनी स्वयंस्फूर्तीने शिबिरात येऊन मुलांना एक सुंदर पोवाडा शिकवला.



**अन्य कार्यक्रम :** रक्षाबंधनाच्या दिवशी बालशाखेतील वर्धक-वर्धिका ससून रूग्णालयाच्या श्रीवत्स अनाथालयात गेले होते. त्यामुळेच मुलांना आईवडील नसलेली मुले कशी राहतात हे पाहता आलं. त्यांच्याशी वर्धकांनी मैत्री केली, गप्पा मारल्या व त्यांना वर्धिनीची गाणीही शिकविली.

**गुरूपौर्णिमा :-** या दिवसाचे औचित्य साधून गुरूशिष्यपरंपरा या विषयावर कथाकथनाची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सारंग पोफळे विजयी झाला.

*__दिवाळी फराळ :-__ विश्वास बसणार नाही पण हे खरं आहे. दिवाळीमधील भाऊबीज कशी साजरी करायची या विषयी मुलांशी गप्पा मारताना मुलं कार्यकर्त्यांना म्हणाली, ‘दिवाळीचा फराळ आपल्या घरातील लेकांबरोबर, नातेवाईकांबरोबर करताना आपल्याला मजा येते. पण मग त्या श्रीवत्स अनाथालयातील मुलांना कोण फराळ देणार? मग आपणच भाऊबीजेला त्यांना फराळ घेऊन गेलो तर?, मुलांच्याच कल्पनेप्रमाणे खऱ्या अर्थाने भाऊबीज साजरी झाली.*

**पालखी सोहळा :-** आषाढी एकादशीच्या दिवशी रिंगण, भजन, नामाचा गजर या पारंपारिक पध्दतीने बालशाखा व पाकोळी बालवाडी विभाग यांची पालखी वाजतगाजत विठ्ठल मंदिरापर्यंत गेली. पारंपारिक पध्दतीबरोबरच प्रदूषण, पर्यावरण या विषयाबाबत जनजागृती करणारे फलक मुलांनी हातात धरले होते.



**दहीहंडी :-** गोकुळ अष्टमीच्या निमित्ताने दहीहंडीचा कार्यक्रम शाखेत घेण्यात आला. सर्वजण एकत्र येऊन दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न करीत होते. संघटनेचा संस्कार नकळत मनात रूजत होता.

**गणेशोत्सव :-** गणेश चतुर्थीच्या दिवशी नवचैतन्य मित्रमंडळाच्या मिरवणुकीपुढे, तर गणेश विसर्जनाच्या दिवशी मानाच्या तुळशीबाग गणपतीसमोर बालशाखेचे रूमाल पथक बेभानपणे नाचले.

**चांदणी भोजन :-** ६ सप्टेंबर रोजी रात्री वर्धिनीच्या इमारतीवर एकत्रिकरणाचा कार्यक्रम झाला. चांदण्यातील सहभोजन आणि पद्यांच्या जल्लोषाने कार्यक्रम रंगला.

❋ ❋ ❋

**नीतिपरायण व्हा, वीर बना, निष्कपट बना - तुमच्या चारित्र्याला कोणत्याही प्रकारचा कलंक लागू देऊ नका, प्रत्यक्ष मृत्यूशी सामना करण्याची हिंमत ठेवा.**

## रामकृष्ण शाखा :

**विज्ञान दिन** - २५ फेब्रुवारी रोजी वर्धिनीच्या पूर्णवेळ कार्यकर्त्या कु. लता टिळेकर यांच्या हस्ते ‘विज्ञान प्रकल्प’ प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. परीक्षक म्हणून एस पी कुलकर्णी सर, सूर्यवंशी सर व डॉ. देवपूरकर सर उपस्थित होते. एकूण ४० प्रयोगांचा समावेश ह्या प्रदर्शन स्पर्धेत होता. हा विज्ञान दिन ‘स्व’-रूपवर्धिनीच्या वास्तूवर संपन्न झाला.

**सावरकर पुण्यतिथी**

वक्ते - श्री. मिलिंद सबनीस सर

संपूर्ण कार्यक्रम समईच्या मंद प्रकाशात झाला. त्या वेळी वर्धकांनी सावरकरांच्या जीवनातील काही प्रसंग नाट्यरूपात सादर केले.

**गटकार्य** : मे महिन्याच्या सुटीत वर्धकांना गटकार्य देण्यात आली. तीन गट करून प्रत्येकाला वेगळे विषय देण्यात आले. विषय - पाच गडांची माहिती, पुणवडी ते पुणे इतिहास व पुणे स्टेशन परिसराचा नकाशा.

**गणेशोत्सव पथक**

ह्या वर्षी प्रथमच शाखेने ‘घुंगरूकाठी’चे पथक गणेशोत्सवासाठी बसविले. एकूण २४ वर्धकांचे पथक होते. गणवेशसुध्दा वेगळा होता. बंडी आणि धोतर व त्यावर भगवा शेला एकूणच नवीन कार्यक्रम करत असल्यामुळे शाखेवर उत्साहाचे वातावरण होते. उत्सवाच्या दिवसात त्वष्टा कासार समाज संस्था ह्या मंडळा समोर पथक करत असताना शिवसेना नेते खुद्द श्री. राज ठाकरे पथक बघत होते. तो प्रसंग मुलांच्या नेहमी स्मरणात राहील असा होता.

**अथर्वशीर्ष पाठांतर :-** दिनांक २६/८/२००१ वेळ - सकाळी ६.१५ वा स्थान - सारसबाग मंदिर

ह्या दिवशी सकाळी अथर्वशीर्ष पठण झाले व त्यानंतर श्रीमती पाळंदेबाईंनी याचा अर्थ सांगितला. एकूण २४ वर्धक व ९ युवक उपस्थित होते.

---

## स्वामी योगानंद शाखा :

१) संक्रांतोत्सव :- प्रात्याक्षिक - पदविन्यास आणि दंड, प्रमुख - मिलिंद वरखेडकर

२) विज्ञानदिनानिमित्त झालेल्या विज्ञानप्रयोग स्पर्धेत शाखेने सहा प्रयोग सादर केले.

३) फेब्रुवारी महिन्यात इयत्ताशः पालकसभा झाल्या.

४) मे महिन्यात शाखेत सरावासाठी “वार्षिक परीक्षा” झाली.

५) गटकार्य म्हणून मे महिन्यात संपूर्ण पुणे शहरात फिरून वर्धकांनी पुणे शहराचा नकाशा तयार केला. शिवाय विविध बौध्दिक व शारीरिक स्पर्धा झाल्या. शाखेची केंजळगड व रायरेश्वरला उन्हाळी सहल झाली. संख्या - ४०

६) जून महिन्यात नव्या-जुन्या पालकांची एकत्रित पालकसभा झाली. वक्ते होते श्री. ज्ञानेश पुरंदरे.

७) गणेशविसर्जन मिरवणुकीत शाखेने श्रीमंत दगडूशेठ गणपतीसमारे झांजपथक सादर केले. संख्या - ४८

याशिवाय गणेशोत्सवातील दहा दिवसांत पुण्यातील वेगवेगळ्या प्रमुख मंडळांसमोर “गणेशमेळ्याचा” कार्यक्रम सादर केला. या संपूर्ण कार्यक्रमाचे एकूण १४ प्रयोग झाले., कार्यक्रमाचे आयोजन-संयोजन शाखेतील युवकांनीच केले. पालकांचे सहकार्यही या दहा दिवसांत मिळाले. (कसबा गणपती, केसरीवाडा, आखिल मंडई, गरूड गणपती, विध ायक मित्र मंडळ, आपला मारूती, प्रकाश नवजवान, खडीचे मैदान, तुळशीबाग माती गणपती, भोलेनाथ मित्र मंडळ, वीर अभिमन्यू मित्र मंडळ.)

**फसवणूक करुन कोणतेही मोठे कार्य होत नसते. प्रेम, सत्यनिष्ठा व प्रचंड उत्साह यांच्या द्वारेच महान कार्ये होत असतात. म्हणून आपले पौरुष प्रकट करा.**

८) १४ नोव्हेंबर रोजी शाखा वर्धापनदिनी सकाळी पालक व शिक्षकांचे एकत्रिकरण झाले. मा. चारूदत्त आफळे हे प्रमुख अतिथी होते. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन-संयोजन ८वी, ९वीतील विद्यार्थ्यांनी केले. हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते.

९) डिसेंबर महिन्याच्या सुरूवातीला शाखेची सायकल सहल सिंहगडला जाऊन आली. इयत्ता ५वी ते १० वीचे एकूण ४१ विद्यार्थी त्यात सहभागी होते.

१०) वर्षभरातील काही व्याख्याने :- मोहन शेटे - दैनंदिन शाखा, नाना लाभे - हस्ताक्षर सुधारणा, ज्ञानेश पुरंदरे - व्यवस्थाविभागाचे महत्व, परीक्षाकाळातील मानसिकता

या वर्षामध्ये दैनंदिन शाखेत घेतले गेलेले "साप्ताहिक" कार्यक्रम खालीलप्रमाणे होते-

स्तोत्रपठण, पद्यपाठांतर, हस्ताक्षर सुधारणा, बातम्या वाचन, वक्तृत्व विकसन, बालन्यायालय, प्रतिभा विकास, बौध्दिक स्पर्धा, क्रीडा प्रशिक्षण वर्ग, मानसिक विकास बैठक



## भव्य गणेशमेळा

गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक प्रबोधनाचे एक साधन म्हणून मेळ्याची कल्पना पुढे आली. लोकजागरणाचा उद्देश डोळ्यापुढे ठेवून सुरेंद्र खेडकर व सुमीत डोळे यांनी मेळ्याची संहिता तयार केली. युवक बैठकीत कामाचे नियोजन झाले व झाडून सारे कामाला लागले. अभिनय व नृत्यांची तालीम, ध्वनिमुद्रण, गणेश मंडळांशी कार्यक्रम निश्चितीसाठी संपर्क, वेशभूषा, रंगभूषा, नेपथ्य रचना, प्रसिध्दी व्यवस्था, प्रवास - खान-पान व्यवस्था इत्यादी सर्व छोट्या-मोठ्या गोष्टींचे तपशील पक्के होऊ लागले. 'पुण्यात गणेशोत्सवाला प्रारंभ झाला. चौकाचौकात टाचा उंच करून हे लोक काय बरं बघण्याचा प्रयत्न करताहेत?' 'अहो मंडळापुढे वर्धिनीच्या मुलांचा गणेशमेळा चालू आहे!' हे संवाद या उत्सवाच्या दाही दिवसात कार्यक्रमाच्या आसपास ऐकायला मिळायचे. हा ४५ मिनिटांचा मेळा थोडक्यात असा व्हायचा" अष्टविनायकांच्या गानवर्णनाने मेळ्याची सुरूवात होते. वासुदेव गिरक्या घेत गणेशाचे गुणवर्णन करतो. स्वराज्य संस्थापनेसाठी शिवरायांचा आखाडा रंगतो. लाठ्या-काठ्या, भाला-बोथाटी, तलवारबाजी, हल्लाफोड यांचा डाव रंगतो. शिवरायांसह सारे मावळे स्वराज्याची शपथ घेतात. सिंहासनाधीश्वर शिवछत्रपतींवर पुष्पवर्षाव होतो. लोकजागरण करणारी लोकमान्य टिळकांची छबी जनसमुदायात प्रेरणा जागृती करताना दिसते आणि शेवटी देशाच्या समृध्दीसाठी निवेदकाच्या शपथेत उपस्थित सर्व स्वतःचा सूर मिसळतात. सर्व श्रोतृवृंद गजाननाच्या आरतीत ताल धरतो.

**सत्यासाठीच माझे जीवन आहे. सत्य हे खोट्याशी कधीच सख्य जोडणार नाही. सर्व जग जरी माझ्या विरुध्द उभे झाले तरी शेवटी सत्याचाच विजय होईल.**

**विवेकानंद शाखा :**

१) शाखा विभागाच्या केंद्रीय मकर-संक्रमण उत्सवाचे संयोजन यावर्षी विवेकानंद शाखेच्या युवक गटाने अत्यंत प्रभावीपणे केले.

२) पालक मेळावा : फेब्रुवारी महिन्यातला पाहिला कार्यक्रम झाला तो पालक मेळाव्याचा. वेगळ्या तऱ्हेचा व वेगळी कल्पना लढवून हा 'मेळावा' घेतल्यामुळे खुपच रंगला.

पाल्यांचा व पालकांचा सहभाग, युवकांशी विविध विषयांवरील चर्चा व पालकांसाठी असलेल्या आकर्षक टेलीमॅचेस स्पर्धा यामुळे हा मेळावा खूपच यशस्वी झाला. श्री. नरवणे सर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. पालकांनी पाल्याशी कसे वागावे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. ५वी-६वी, ७वी-८वी व ९वी-१०वी अशा तीन गटांमधे वेगवेगळ्या वर्गांमध्ये विविध पैलूंवर चर्चा झाली. सर्व पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक होता. शाखेत नियमित आल्याने वर्धकांत अनेक चांगले बदल झाल्याचे पालकांनी बोलून दाखविले. आमच्या मुलाला आतापर्यंत क्लासची गरज वाटली नाही. तो आता दहावीला आहे. शाखेत व घरी तो स्वतःचा अभ्यास स्वतः करतो. शाखेचे आमच्यावर एकप्रकारे उपकारच आहेत" अशी भावना श्री. आंग्रे यांनी व्यक्त केली. काही पालकांनी सूचनाही केल्या. सर्व स्पर्धांमध्ये पालकांनी उत्साहाने भाग घेतला.

३) १९ फेब्रुवारी रोजी विवेकानंद शाखेने शिवजयंतीनिमित्त पांडवनगर, गुंजाळवाडी व हेल्थ कँप भागात भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकीच्या अग्रभागी वर्धिनीचा बॅनर, त्यामागे मुख्य ध्वज, ध्वजदल, ढोल-ताशांचे वादनदल, त्यामागे सुशोभित वाहनावर शिवछत्रपतींची प्रतिमा असा सरंजाम होता. हुतात्मा राजगुरू विद्यालयापासून मिरवणुकीस प्रारंभ झाला. चौकाचौकात संघाचे कार्यकर्ते वेत्रचर्म व हल्लाफोडीचे प्रात्याक्षिक करत होते. ढोल-ताशांच्या गजरात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिवजयंती या भागात साजरी झाली.

शाखापरिसरामध्ये शाखाकार्य व 'स्व'-रूपवर्धिनी पोहोचवणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची जाणीव ठेवणे, जुन्या-नव्या कार्यकर्त्यांचे एकत्रीकरण इ. उद्देश यातून सफल झाले. ज्ञानेश पुरंदरे यांच्या शिवचरित्रावरील ओघवत्या भाषणाने सर्व जण प्रभावित झाले.

४) आंतरशालेय नाट्यस्पर्धेत रमणबाग शाळेने प्रथम पारितोषिक मिळविले. त्यांना मिळालेल्या बक्षिसातून त्यांनी काही पुस्तके विकत घेतली व ती पुस्तके विवेकानंद शाखेतील वर्धकांना घरी जाऊन दिली. २५ फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम झाला. पद्य परस्परपरिचय व अल्पोपहार असा कार्यक्रम झाला. रमणबागचे १० विद्यार्थी व श्री. शेटे सर त्यानिमित्त शाखेवर आले होते.

५) स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला सर्व शाखांचे एकत्रीकरण बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात झाले. त्याप्रसंगी मैदानी स्पर्धा व बौध्दिक कार्यक्रमांचे संयोजन विवेकानंद शाखेने केले होते. सुप्रसिध्द व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडुलकर यांचे मार्गदर्शन या कार्यक्रमास लाभले.

६) प्रभात चित्रगृहातील बालचित्रपट महोत्सवात शाखेतील वर्धक व युवकांनी 'मल्ली' **'Born to be wild'**, 'बालशिवाजी' इत्यादी संस्कारक्षम चित्रपट पाहिले व नंतर चर्चेद्वारा त्यांचे रसग्रहण केले.

७) फिल्म इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थ्यांच्या टेलिफिल्म

**हे जग भेकड माणसांसाठी नाही. पळून जाण्याचा प्रयत्न करु नका. जयापजयाची पर्वा करु नका.**

बनविण्याच्या प्रकल्पात शाखेतील मुलांनी सहभाग घेतला. 'खेळ' या विषयावरील या टेलिफिल्ममधे आपल्या सहजसुंदर अभिनयाने विद्यार्थ्यांनी बहार आणली. त्याचबरोबर फिल्म बनताना संबंधित सर्व तांत्रिक विषयांचेही ज्ञान मुलांना याद्वारे झाले.

✣ ✣ ✣

## आजोळ :

**संक्रांत :-** या वर्षी 'शाखेत नेहमी होणारे खेळ' हेच प्रात्यक्षिक दाखवायचे असे निश्चित केले. उडता मासा, किल्ल्यावर स्वारी, शिडी, स्वर्गारोहण व पायऱ्यांच्या विविध खेळ असे या प्रात्यक्षिकात दाखवले. संगीताच्या साथीत शिटीवर हे खेळ बसवले होते. कुठेही तोंडी आज्ञांचा उपयोग न करणे हे या प्रात्यक्षिकांचे वैशिष्ट्य होते.

**महाशिवरात्र :** सकाळी सात वाजता कण्वाश्रमात सर्वांचे एकत्रिकरण झाले. प्रारंभी मौन उपासना व नंतर ॐकार उपासना झाली. सौ. मंजूषाताई कुलकर्णी यांचे बोलणे झाले. त्यानंतर सौ. स्नेहलताई कुलकर्णी यांच्याकडे प्रसादाकरिता सर्वजण गेले होते.

**'आनंद' पाणपोई -** प्रतिवर्षाप्रमाणे १४ एप्रिलला पूजनीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉक्टर आंबेडकर उद्यानालगत वर्धिनीची पाणपोई उभी होती. बौध्द समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते माननीय पालवे गुरूजी यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन झाले. भावपूर्ण बुध्दवंदनेनंतर त्यांचे उद्बोधक मार्गदर्शन



झाले. त्यांच्याबरोबर शिवदर्शन परिसरातील श्री. बापू शिळीमकर, श्री. बबलू शिंदे, श्री. लक्ष्मण सुचारू हे उपस्थित होते. सुमारे अडीच हजार नागरिकांनी पाणपोईचा लाभ घेतला. जलपानाकरिता आलेल्या सर्वांना मोगऱ्याची फुले व प्रबोध उद्योगाच्या वतीने दिलेले बाबासाहेबांच्या वचनाचे स्टीकर भेट दिले.

**विज्ञानप्रदर्शन :-** विज्ञानप्रदर्शनापूर्वी आजोळ शाखा अंतर्गत विज्ञानप्रयोग स्पर्धा घेण्यात आली. त्यातून निवडलेला प्रयोग विज्ञानप्रदर्शनाकरिता पाठवला. छोट्या गटात या प्रयोगाला द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

**रांगोळीस्पर्धा :-** एकूण एकवीस मुलांनी यात सहभाग घेतला. कु. कुणाल कुंभारे याला प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

**गणपतीपथक :-** यंदाच्या आजोळ पथकाचे नेतृत्व कु. कुणाल कुंभारे याने अत्यंत यशस्वीपणे केले. गतवर्षीपासून आजोळमध्ये पथकनेतृत्व शाखेतील वर्धकांकडे देण्याचा प्रयोग आवर्जून केला जात आहे. विशेष म्हणजे हा प्रयोग अत्यंत यशस्वी झाला.

**सहल :-** उन्हाळ्यात सिंहगडावर एक दिवसाची सहल गेली होती. मुलांना गडावरचा हा अनुभव वेगळाच होता. दिवाळीच्या सुटीत मुलांना संभाजीउद्यानात नेले होते. तीन चार तास एकत्रितपणे जाणे खेळणे की ज्यातूनही मुले खूप काही शिकू शकतात आणि नंतर प्रत्येकाने आपापल्या घरून करून आणलेले पोहे खाणे असा कार्यक्रम झाला. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चरित्र सर्वांनाच मार्गदर्शन करणारे आहे. शाखेतील मुलांना याचा अनुभव मिळावा म्हणून 'वीर सावरकर' चित्रपट बघण्यास नेले होते. मुले चित्रपटाने अत्यंत भारावून गेली होती.

**उठा आणि कामाला लागा. हे जीवन आणखी किती दिवस टिकणार आहे? जन्माला आलाच आहात तेव्हा जगात काहीतरी महत्त्वाचे कार्य करुन जा.**

## 'कवतुकांची आवर्तनं'

वर्धिनीचे एका देणगीदार डॉ. सुधीर डोंगरे यांचे गणेशोत्सवात 'अथर्वशीर्ष म्हणण्याकरिता काही मुलांना पाठवा' असे आमंत्रण आले होते. त्यानुसार आजोळ शाखेतून तेरा मुले गेली होती. डॉ. डोंगरे यांच्याकडील ४०-५० नातेवाईक, पाहुणे कार्यक्रमाला उपस्थित होते. मुलांच्याबरोबर गेलेल्या कार्यकर्त्या शिक्षिका सांगत होत्या. "गेल्या गेल्या मुलांनी आपल्या चपला अगदी ओळीत ठेवल्या. ओळीनं मोरीमध्ये जाऊन हातपाय धुऊन आले. गणरायाला नमस्कार करुन सर्वजण शिस्तीत बसले. 'या कुन्देन्दुतुषारहार धवला........' 'गुरुब्रह्मा --------', गीतेचा बारावा अध्याय, अथर्वशीर्ष - या क्रमानं म्हणणं झालं. म्हणण्याची लय, उच्चारांची स्पष्टता - शुध्दता सर्वांनाच जाणवली. या सर्वांच्या जोडीला मुलांची शिस्त, सर्वांना वंदन करण्याची नम्रता हेही सर्वांना भावलं.

खरं म्हणजे शाखेत हे सर्व नित्य घडणारं. नवं असं काहीच नाही. पण शाखेच्या बाहेर पडल्यावर शाखेतल्या संस्कारी वर्तनाला सज्जनांकडून जो प्रतिसाद मिळतो, तोच या संस्कारांना सामर्थ्य देत असतो.

या तेराजणांच्या गटाचा भाव नंतर चांगलाच वधारला. सौ. स्नेहलताई, सौ. रोंघे आजी, सौ. मंजूषाताई यांच्या घरीही अशीच 'कवतुकाची आवर्तनं' दणक्यात पार पडली. डॉ. डोंगरे यांनी या तेराही वर्धकांचा भेटवस्तू देऊन, अल्पाहार देऊन आणि दक्षिणाही देऊन खूप कौतुक केले.

## ❋ हार्दिक अभिनंदन ❋

❋ वर्धिनीचे ज्येष्ठ युवक कार्यकर्ते **श्री. चैतन्य तेंडुलकर** यांनी अमेरिकेतील न्यू हेवन्स युनिर्व्हसिटी मध्ये एम एस परीक्षेत ८७.५% गुण मिळवून दैदीप्यमान यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

❋ वर्धिनीच्या ग्रंथपाल श्रीमती नीलाताई कुडलिगार यांचा मुलगा व मुली वर्धिनीचे कार्यकर्ते आहेत. या बहिण-भावंडांनी मिळविलेल्या यशाचे अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे. मोठी मुलगी ***कु. मंगला*** ही महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षे आसाममध्ये वनवासी कल्याण आश्रमाचे पूर्णवेळ काम करीत होती. तेथून परतल्यावर बी.एड च्या पदवी शिक्षणासाठी तिने प्रवेश घेतला. या परीक्षेत तिला ७५% गुण मिळाले. तिचीच बहीण ***कु. विद्या*** ही वर्धिनीच्या युवती विभागाची प्रमुख म्हणून सध्या काम करते. डिप्लोमाच्या अखेरच्या वर्षात ८७% गुण मिळवून ती उत्तीर्ण झाली तर धाकटा भाऊ ***किरण*** याने कंबाईंड डिफेन्स सर्व्हिसेसच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. सध्या लेफ्टनंट या अधिकारी पदाच्या प्रशिक्षणासाठी तो डेहराडून येथे प्रशिक्षण घेत आहे.

**धीट व्हा, साहसी व्हा. प्रथम माझ्या संतानांनी वीर बनले पाहिजे. कोणत्याही कारणाने सत्याशी थोडी देखील तडजोड करु नका.**

# इथेच टाका तंबू !



वर्षाऋतु सरला कि सगळीकडे रानोमाळी हिरवंगार होते. अशा एखाद्या हिरव्याकंच रानात दिवाळी शिबीर व्हावे हा विचार पुढे आला. जागेचा शोध सुरू झाला आणि पौड-कोळवण रस्त्यावर साठेसाई गावात खिलारे मावशी-काकांच्या मोकळ्या रानात शिबीरस्थान पक्के झाले. जागेचीं साफसफाई, गवत कापणे, मैदानाचे सपाटीकरण यासाठी युवकांचे शनिवार-रविवार खर्ची पडू लागले. ग्रामस्थांनी वीज व पाण्याची सोय त्वरेने करून दिली. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान लोकांना वक्ते म्हणून निमंत्रित करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी भूमीपूजन झाले आणि साऱ्या युवकांनी दिवाळीचा सण विसरून, अहोरात्र खपून पंधरा राहूट्या, तीन मोठे तंबू आणि तीनशे जण बसू शकतील असा भव्य मंडप उभे केले. या आठ-दहा एकर जागेला प्रकाशित करण्यासाठी विद्युत विभागाचे कार्येकर्ते दिवसरात्र काम करीत होते.पाण्याची प्रचंड टाकी आणि प्लंबिंगचं काम पूर्ण झाले. विशेष म्हणजे या शिबीराचे कार्यालय संपूर्ण संगणकीकृत केले होते. शिबीरार्थी, अतिथी व ग्रामस्थ यांच्या स्वागतासाठी कार्यालय सिध्द झाले. १७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर असा आठ दिवसांचा या मोठ्या शिबिराचा कालावधी होता.

सर्व शिबिरार्थी जवळ जवळ ५०-६० किलोमीटरचा प्रवास करून शिबीरस्थानी पोहोचले. सर्व बाजूंना हिरव्यागार डोंगररांगा, डोलणारी शेते, खळाळून वाहणारी नदी आणि एखाद्या छोट्या नगरासमान असणारे शिबिरस्थान. हे सर्व दर्शन घडताच मंडळींचे देहभान हरपले. या सुंदर परिसरात आठ दिवस रहायचे या कल्पनेनेच सर्वजण खूष होऊन गेले.

शिबिराचे सर्व कार्यक्रम नियोजित वेळापत्रकानुसार सुरू झाले. सर्वजण पहाटे लवकर उठत. नानाविध रंगांची उधळण करणारा सूर्योदय पहात. प्रातःविधी आवरून एकात्मता स्तोत्र पठणासाठी सर्वजण मैदानावर उपस्थित रहात. नंतर बेफाम व्यायाम होई. मैदानावर रोज वेगवेगळे खेळ असत. तसेच समारोप कार्यक्रमासाठी प्रात्यक्षिक सरावही होई. त्यानंतर गरमागरम न्याहारी. चव न विसरणारी. मग नदीच्या पाण्यात आंघोळीचा - खरं म्हणजे डुंबण्याचा- आवडता कार्यक्रम मनसोक्त चाले. अगदी शिक्षक ओरडेपर्यंत. अशा या धमाल स्नानानंतर निवास स्वच्छता आवरून टिपणवही व पेन घेऊन सर्वजण व्याख्यानासाठी मंडपात जमत. टिपणे घेणे, प्रश्न विचारणे, शंकासमाधान करून घेणे असे हे सत्र पार पडे. यानंतर थोडी विश्रांती नंतर गटकार्य. भोजन व पुनः दुपारचे व्याख्यानसत्र, सायंशाखा, भोजन, सत्रकार्यक्रम व पसायदानानंतर दीपनिर्माण असा दिनक्रम असे.

**वत्सा, ज्यांच्या आत वज्राने बनलेल्या मनाचा वास आहे असे लोखंडी स्नायू व पोलादी मज्जातंतू मला हवे आहेत.**

या शिबिरात प्रख्यात वास्तुशास्त्रज्ञ डी. एस. कुलकर्णी, श्री. उपेंद्र भट, श्री. केशवराव बडगे या सुप्रसिध्द व्यक्तींनी आपल्या यशस्वी जीवनामागील कष्टाचे अनुभवविश्व मुलांसमोर मांडले. श्री. अनिलराव गोडबोले यांनी भारतरत्न गानसम्राज्ञी लतादिदींचे जीवनचरित्र मांडले. श्री. सुरेशराव पिंगळे यांनी अत्यंत प्रभावीपणे 'स्वदेशीची संकल्पना' मांडली. सर्पमित्र श्री. श्रीराम शिंदे यांनी विविध प्रकारचे विषारी-बिनविषारी सर्प हाताळत मुलांच्या अनेक शंकांचे निरसन करून, सर्पाबद्दल उपयुक्त माहिती दिली. मूर्तीकार श्री. विवेक खटावकर यांनी मूर्तीकलेची सप्रात्याक्षिकं माहिती देत वर्धकांकडूनही विविध मूर्ती बनवून घेतल्या. श्री. निनाद बेडेकरांनी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे प्रेरक चरित्र मांडले. श्री. ज्ञानेश पुरंदरे यांचे रोज जोशपूर्ण शिवचरित्रकथन होई. शिबिरकाळात वर्धकांनी आसपासच्या गावामध्ये घरोघरी संपर्क करून, स्वतःचा व वर्धिनीच्या कार्याचा परिचय करून दिला. ग्रामीण जीवनाची, शेतीभातीची ओळखही वर्धकांना झाली. ह्या शिबीरात 'शोध लादेनचा' हा गुप्तहेरांचे रोमांचकारी काम करायला लावणारा अत्यंत रंजक खेळ सर्व वर्धकांना खूपच आवडला.

शिबिराच्या समारोपाच्या अध्यक्षस्थानी ग्रुपकॅप्टन आपटे उपस्थित होते. विविध प्रात्याक्षिके पालक व ग्रामस्थ यांच्यासमोर सादर करण्यात आली. मा. अध्यक्षांनी यशस्वी जीवनासाठी अंगी बाणवावयाच्या गुणांची महती स्वतःच्या सैनिकी जीवनातील अनुभवांच्या आधारे मांडली.


दि. २४ ला 'मनी हुरहूर दाटली' अशा मनस्थितीत जड अंतःकरणाने सर्वांनी शिबीरस्थानाचा निरोप घेतला.

*रोज सायंकाळी श्री. ज्ञानेश पुरंदरे यांचे अत्यंत जोशपूर्ण शिवचरित्रकथन शिबिरस्थानी व्हायचे. ग्रामीण भागातले हे शिबिर. सायंकाळी शेतीभातीची कामे उरकून आसपासच्या चार गावातले ग्रामस्थ चावडी-कट्ट्यावर येऊन बसत. ध्वनिक्षेपकावरून ऐकू येणारे शिवचरित्र अगदी 'शिवभावाने' ऐकत. त्यांनी एकही दिवस चुकवला नाही. तसेच ह.भ.प. श्रेयस बडवे यांचे ध्रुवबाळाची आख्यायिका मांडणारे भक्तीरसपूर्ण कीर्तनही ग्रामस्थांना खूप आवडले. अनेक ग्रामस्थांनी प्रथमच नारदीय पध्दतीच्या कीर्तनाचा लाभ घेतला.*

**विशेष उपक्रम :** शालान्त परीक्षेला बसलेल्या आजोळच्या सर्व माजी विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी घरी जाऊन शुभेच्छा देण्याचा उपक्रम आजोळच्या वतीने दरवर्षी करण्यात येतो. यावर्षीही श्री. सु.म. जोशी सर, प्रा. छाया गायकवाड व श्री. जयंत कवठेकर सर यांनी आजोळच्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन शुभेच्छा दिल्या. अशा संपर्कामुळे दहावीनंतर आजोळ प्रकल्पावर नव्या फळीतील कार्यकर्ते दिसू लागले आहे.

**सत्य हे असत्याहून अनंतपटीने प्रभावशाली आहे, चांगुलपणा हा वाईटपणाहून अनंतपटीने प्रभावशाली आहे.**

## ग्राम विकास प्रकल्प :



प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी मावळ खोऱ्यात आपली ग्रामविकास प्रकल्पाची गाडी धावते आहे. खोऱ्यातल्या ज्या सात-आठ गावांमध्ये आपण गेली पाच वर्षे जातोय, तेथील ग्रामस्थांना, विद्यार्थी-विद्यार्थिनींना वर्धिनीची गाडी आता चांगलीच परिचयाची झाली आहे. ४-५ किलोमीटरची पायपीट करुन शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्याला रस्त्यात कुठेही आपली गाडी दिसली की आपलं कुणीतरी आलं असं वाटतं. मग अगदी हक्कानं हात करुन गाडीतून मार्गावर शाळेच्या जवळपासपर्यंत आपण पोहोचणार आणि गाडी जर त्या दिवशी त्याच शाळेत जाणार असेल, तर शाळेपर्यंत आपण जाणार याचा आनंद त्यांच्या डोळयात चमकल्याशिवाय रहात नाही.

ह्या प्रकल्पांतर्गत मुळशी तालुक्यातील खेचरे, काशिग, कोळवण, शेरे व आसदे या गावांमध्ये काम सुरू आहे. वर्षभरात झालेल्या कामकाजाचा हा थोडक्यात आढावा.

१) **शैक्षणिक मार्गदर्शन** : ८वी ते १०वी मधील विद्यार्थ्यांना मुख्यत्वे गणित, इंग्लिश व शास्त्र या विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले. जून २००० ते मे २००१ मध्ये १०वीच्या विद्यार्थ्यांना गणित व इंग्लिश विषयांचे मार्गदर्शन प्रामुख्याने करण्यात आले होते. कारण या विषयांना अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त होते. या वर्षी जून २००१ मध्ये प्रकल्पांतर्गत गावातील शाळांचे बोर्डाचे निकाल तक्ता १ मध्ये आहेत.

**तक्ता-१**

| गाव | विद्यार्थी संख्या | निकाल | |
|---|---|---|---|
| | | मार्च २००० | मार्च २००१ |
| पौड | २० | २८% | ५२% |
| कोळवण | ५० | ४२% | ६२% |
| खेचरे | ५० | ३९% | ८४% |
| शेरे | ३० | २७% | ५०% |
| काशिग | ५० | ४०% | ६२% |

तक्ता १ वरून दिसून येईल की, ज्या गावांमध्ये वर्धिनीचे कार्य सुरू आहे, तेथील १०वीच्या निकालामध्ये चांगला फरक झाला आहे.

यावर्षी आपण एक नवीन प्रयोग करतो आहोत. पुण्यात वर्धिनीच्या दैनंदिन शाखांमध्ये ज्याप्रमाणे काम चालते, त्याप्रमाणे यावर्षी आपण शेरे आणि खेचरे या दोन गावांतील शाळांमध्ये शाखा घेतो आहोत. यात इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. शाळेच्या वेळेव्यतिरिक्त तीन- साडेतीन तास ही शाखा चालते.

शेरेच्या शाळेत प्रत्येक रविवारी सकाळी ७.३० वाजता शाखा असते. त्यासाठी पुण्यातून तीन शिक्षक, व्याख्याते व पुण्यातल्या शाखांमधले ५-६ विद्यार्थी-विद्यार्थिनी, खेळाचे साहित्य, पेटी, ग्रंथालयाच्या पेट्या असा सारा लवाजमा सकाळी ६.१५ वाजता वर्धिनीतून मार्गस्थ होतो. साडेसात वाजता शाळेत विद्यार्थी हजर असतात. थंडी, पाऊस याचा कशाचाही त्यांच्यावर परिणाम होत नाही. यातल्या अनेक विद्यार्थ्यांच्या पायात चपलाच काय तर साधी स्लीपरही नसते. स्वेटर, छत्री वगैरे विषय बाजूलाच राहतात. पण अशाही परीस्थितीत हे विद्यार्थी नित्यनेमाने शाखेत उत्साहाने हजर असतात. ७.३० ला लगेच इ. १०वीचा

**जर सत्य व चांगुलपणा ही दोन्ही तुमच्या ठायी असतील तर ती केवळ आपल्या प्रभावानेच आपला मार्ग तयार करुन घेतील.**

वर्ग सुरु होतो. बीजगणित, भूमिती व इंग्रजी या विषयांचे तास होतात. यात नित्य पाठयक्रमाबरोबरच प्रश्नपत्रिकांचा सराव, पाठांतर, इ. गोष्टींवरही भर दिला जातो. याचवेळी इ. ८वी चे खेळ सुरु असतात. साधारण पन्नास मिनिटे खेळ चालतो. यात विविध खेळ मुले खेळतात. कबड्डी, खोखो लंगडी या नेहमीच्या खेळांबरोबरच डॉजबॉल, बेसबॉल यासारखे नवीन खेळही मुलांना शिकायला मिळाल्याने ती खूष असतात. नंतर ८वीच्याही तासिका सुरु होतात. शेवटचा अर्धा तास संस्कार, कौशल्ये यासाठी असतो. यात विविध विषयांवरची व्याख्याने, हस्ताक्षर सुधारणा, वाचन, लेखन, कौशल्य वगैरे विषय हाताळले जातात.

खेचरे गावच्या शाळेत प्रत्येक शनिवारी ११.३० वाजता शाखा सुरु होते. शनिवारच्या शाळेच्या वेळापत्रकात आपला व्यत्यय होवू नये यासाठी अशी व्यवस्था केली आहे. इथेही शेऱ्यामधील शाळेप्रमाणेच कार्यक्रम चालतात. खेचरेच्या शाळेत खेळ थोडा कमी वेळ होतो कारण तेव्हा तिथे चढते ऊन असते. पण व्याख्याने, व्यवसाय मार्गदर्शन, मुलांशी एखादया विषयावर गप्पा असे काही उपक्रम चालू असतात. या शाखांसाठी ८ वी मधील विद्यार्थी निवडण्यात आले आहेत. वर्धिनीच्या शाखापध्दतीने त्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. यामुळे मुलांमध्ये काही बदलही होत असल्याचे लक्षात येत आहे. मुलांची वाचनाची गोडी वाढते आहे. त्यांच्यामध्ये सभाधीटपणा व आत्मविश्वास वाढतो आहे, हे जाणवते आहे. हे विद्यार्थी अशाच उपक्रमांच्या माध्यमातून शिकत राहिले, तर १०वी झाल्यानंतर याच विद्यार्थ्यांच्या मधून ग्रामीण भागात काम करण्यासाठी समर्थ युवक कार्यकर्ते उभे राहतील, असा कार्यकर्त्यांना पूर्ण विश्वास आहे. अशाच युवकांच्या माध्यमातून खेडेगावातील आवश्यक अशा विकासकामांना चालना देता येईल असे वाटते.

काशिगमध्ये गेल्या दोन वर्षांपासून दवाखाना सुरु आहे. डॉ. सौ. दड्डी व डॉ. सौ. कोठारी या दोन डॉक्टर तेथील दवाखान्यासाठी येतात. दर बुधवारी तिथे दवाखाना असतो. सांधेदुखी, पाठ-कंबरेचे आजार, त्वचाविकार यासारखे पेशंट भात लावणीच्या काळात जास्त असतात. लहान मुले, वृध्द माणसे अशा रुग्णांचे प्रमाण बरेच आहे.

या दोन्ही दवाखान्यांसाठी लायन्स क्लबकडून आपल्याला काही प्रमाणात औषधे उपलब्ध होतात. त्याव्यतिरिक्त लागणारी औषधे मात्र आपण विकत आणतो. यासाठी सामाजिक दृष्टीकोन असणारे आपटे फार्मा व श्रीराम मेडिकल स्टोअर्स यासाखे व्यावसायिक आपल्याला कमी शुल्कात औषधे उपलब्ध करुन देतात.

आक्टोबरपर्यंत काशिग गावामध्येच फक्त आरोग्य केंद्र सुरू होते. खेचरे गावातील ग्रामस्थांच्या विनंतीवरून या गावातही आरोग्यकेंद्र सुरू झाले आहे. या आरोग्य केंद्रासाठी डॉ. सिंधुताई शिराळकर यांचे सहकार्य लाभले आहे. रूग्णांच्या उपस्थितीची कल्पना खालील तक्त्यावरून येईल.

| गाव | वार | रोग्यांची संख्या |
|---|---|---|
| काशिग | बुधवार | ४०±५ |
| खेचरे | शनिवार | १०±५ |

प्रकाल्पांतर्गत उन्हाळी व दिवाळीच्या सुट्टीत निवासी शिबिरेही घेतली जातात. या शिबिरांचे वृत्त तपशीलात स्वतंत्रपणे दिले आहे.

**वाचनालय :-**

शेरे व खेचरे गावातील ८वीमधील विद्यार्थ्यांसाठी गोष्टींच्या आणि १०वीमधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाच्या पुस्तकांचे वाचनालय सुरू करण्यात आले

**तलवार उपसून सारे जग तुमच्याविरुद्ध खडे झाले तरी तुम्हाला जे योग्य वाटते, जे सत्य वाटते ते प्रत्यक्ष करुन दाखविण्याची धमक तुमच्यात आहे काय ?**

आहे. आतापर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याने किमान पाच-सहा गोष्टींची पुस्तके वाचली आहेत.

नित्यनविन अनुभव त्या त्या गावांमधील जीवनातले चढउतार, मुलांच्या अडचणी, उत्साह अशा अनेक गोष्टी कामात मोठी प्रेरणा निर्माण करतात. तसेच शहरी सुखांच्या मुबलकतेची जाणीवही करुन देतात. त्या पार्श्वभूमीवर ग्रामीण समाधानाचे महत्त्व लक्षात येते. परंतू २१ व्या शतकाकडे जाणाऱ्या जगाच्या स्पर्धेत आपला ग्रामीण विद्यार्थी टिकविणे ही काळाची गरज असली, तरी हे किती पराकाष्ठाचे आहे हेही जाणवते.

## या भूमीचा स्वर्ग करू

**कालावधी :१७-४-२००१ ते १९-४-२००१**

**स्थान : शिवछत्रपती विद्यालय पौड**

**शिबिर प्रमुख : प्रा. छायाताई गायकवाड**

परीक्षा संपताच ग्रामीण शाळांतील विद्यार्थ्यांना वर्धिनीच्या शिबिराचे वेध लागतात. वेगवेगळ्या गावच्या शाळांमधील आपले मित्र व वर्धिनीचे ताई-दादा यांच्या सहवासाची ओढ निर्माण होते. यावेळी सहा ग्रामीण शाळांमधील ४५ विद्यार्थी व ४० विद्यार्थिनी शिबिरात आले. व्यायाम, ढोल, प्रशिक्षण, प्रार्थना, गटचर्चा, व्याख्याने, गटकार्ये अशा सूत्रबध्द कार्यक्रमात मुले रमून गेली.

राळेगण सिध्दीचे कर्मयोगी आण्णासाहेब हजारे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ओसाड गावाचे रूपांतर भारतभूमीवरील आदर्श ग्रामात कसे केले, या विषयावरचा विकासपट श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी मांडला. शहरी प्रलोभनांना दूर करून आपणही आदर्श ग्रामांचे निर्माते व्हावे, अशी प्रेरणा या सत्रातून मिळाली.

भारतीय यंत्रयुगाचे एक शिल्पकार श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे उद्यमी जीवन सौ. मेधना अत्रे यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे उभे केले.



श्री. शिरीष पटवर्धनांच्या स्फुर्तीदायी क्रांतीकथांनी सर्वांचीच हृदये भारून टाकली. श्री. श्रीधरपंत फडके यांनी भारतीय मानचित्रांच्या आधारे हिंदुस्थानचा भौगोलिक, राजकीय व सांस्कृतिक परिचय करून दिला. एक महान भारतीय क्रांतिकारक व अमेरिकेतील हरितक्रांतीचे जनक डॉ. पांडूरंग सदाशिव खानखोजे यांचे अत्यंत आगळेवेगळे चरित्र श्री. मिलिंद सबनीस यांनी मांडले. रात्र कार्यक्रमातील शाहीर हेमंत मावळे आणि सहकारी यांनी सादर केलेला स्वदेशीचा व उमाबाई दाभाडेंचा पोवाडा सर्वांनाच खूप आवडला. असा पोवाडा गाता आला पाहिजे अशी प्रत्येकाची भावना होती. शिबिरसमारोपात मा. लवळेकर सरांचे भावपूर्ण मार्गदर्शन झाले. केवळ शिबिर ते शिबिर असा वर्धिनीशी सहवास न राहता वर्धिनीचे शाखाकार्य दैनंदिन स्वरूपात सर्व गावांमध्ये व्हायला हवे, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. अत्यंत जड अंतःकरणाने व अश्रुपूर्ण नयनांनी वर्धिनीच्या ताई-दादांचा निरोप घेऊन सर्व विद्यार्थी आपापल्या गावी परतले. पण वर्धिनीचे काम नियमितपणे करण्याचा ठाम निर्धार त्या प्रत्येकाची सदैव साथ-सोबत करणार होता.

**सत्याचे अनुसरण करा - मग ते तुम्हाला कुठेही घेऊन जावो;**

# केल्याने होत आहे रे ...

**कालावधी :६-११-२००१ ते ९-११-२००१**


**स्थान : ‘स्व’-रूपवर्धिनी**

**शिबिर प्रमुख : उमेश बिबवे**

इयत्ता आठवी, नववीची शेरे, खेचरे व आसदे या ग्रामशाखांमधील ४० मुले व ४५ मुली शिबिरास उपस्थित होते. यापैकी ८०% विद्यार्थी प्रथमच घरापासून दूर शिबिराला आले होते. पुण्याला वर्धिनीच्या वास्तूत पोहोचल्यावर त्यांना सर्व कसे नवे-नवे वाटले. शिबिरातील नियोजित सूत्रबध्द कार्यक्रमांचा ते पहिल्यांदाच अनुभव घेत होते.

शिबिरातील व्याख्यानांचे विषय अत्यंत उद्‌बोधक आणि रोचक होते. प्रथम सत्रात श्री. रवितात्या पायगुडे यांनी आपल्या कष्टसाध्य, यशस्वी शेतीची कथा विद्यार्थ्यांना सांगितली. कितीही समस्या असली तरी “केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे” या उक्तीप्रमाणे रेताड जिरायती जमिनीमध्ये त्यांनी नंदनवन फुलवले. दैनंदिन जीवनातील अनेक वैज्ञानिक शंकाचे समाधान श्री. सुनिल कुलकर्णी यांनी पुरेपूर केले. दुपारच्या गटकार्यामध्ये सौ. काळे आजी व त्यांच्या स्नुषा यांनी हसत खेळत दिपावलीसाठीचे आकर्षक आकाशकंदील तयार करून घेतले. गणित हा खरे तर खूपच नवलपूर्ण विषय. पण काहींनी उगाचच त्याचा बागुलबुवा केला आहे. श्री. गोडसे सरांनी हा विषय हसत खेळत शिकताना किती आनंद मिळवून देतो हे मुलांना दाखवून दिले.

११ सप्टेंबर च्या घटनेने अमेरिका हा प्रत्येकाचा कुतुहलाचा व चर्चेचा विषय बनलेला. अमेरिकेत स्थापत्य उद्योगात अत्यंत यशस्वी कारकीर्द केलेले व नुकतेच ग्रामविकसनाच्या कार्यासाठी भारतात परतलेले श्री. हरीष व्होरा यांनी शिबिरास भेट दिली. मुलांनी अमेरिकेसंबंधी अनेक प्रश्न त्यांना विचारले. श्रमनिष्ठा, सातत्य व चिकाटी ही अमेरिकन युवकांची बलस्थाने आहेत व त्याच आधारावर तो देश सर्वोच्च जागतिक महासत्ता बनला आहे, हे अनेक उदाहरणे देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. ग्रामीण जीवनाचा पर्यावरण हा तर जीवाभावाचा विषय आहे. श्री. गुलाबराव सपकाळ सरांनी “मैत्री -पर्यावरणाशी” या सत्रात मानवाचे पर्यावरणाशी असणारे अतूट नाते निसर्गाच्या रक्षणानेच दृढ राहणार आहे, असा विश्वास वर्धकांमध्ये जागवला. ‘मन करारे प्रसन्न । सर्व सिध्दीचे कारण ।।’ या समर्थांच्या वचनात सांगितल्याप्रमाणे खरोखरच मनाची शक्ती काय चमत्कार घडवू शकते, हे श्री. शिरीषराव पटवर्धन यांनी समजावून सांगीतले.



एका सायंकाळी शिबिरार्थींनी इतिहासप्रसिध्द शनिवारवाड्यास भेट दिली. ‘गाथा-छत्रपतींच्या-पेशव्यांच्या’ हा कार्यक्रम पाहून मराठ्यांच्या तेजस्वी पराक्रमाचे दर्शन त्यांना झाले. रात्रकार्यक्रमात- नाट्य, पद्य इत्यादी उपक्रमात मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला. संघभावनेवरील ‘लगान’ हा आगळावेगळा चित्रपट मुलांनी पाहिला व तो त्यांना खूपच आवडला. अत्यंत सुदैवाची गोष्ट म्हणजे या शिबिराचे उद्‌घाटन सत्र वर्धिनीचे संस्थापक मा.श्री. कृ.ल. पटवर्धन सर यांनी घेतले, तर शिबिराचा समारोप वर्धिनीचे विद्यमान कार्याध्यक्ष मा. राजाभाऊ लवळेकर यांच्या मार्गदर्शनाने झाला.

**आपण आशावादी बनले पाहिजे आणि प्रत्येक वस्तूमधील चांगलेपणा पाहण्याचा यत्न केला पाहिजे.**

## शारदामणी महिलाविभाग :

**शिवणवर्ग :** हा गेली अकरा वर्षे सातत्याने चालणारा वर्ग. यंदा या वर्गात पंधरा महिला व मुलींनी प्रवेश घेतला आहे. या वर्गात शिकविल्या जाणाऱ्या अकरा कपड्यांपैकी बेबी फ्रॉक, साडी पेटीकोट, मुलींचे पेटीकोट, ब्लाऊज, आदि कपड्यांमधून महिलांना चांगली आवक मिळते. या वर्गातून घेतली जाणारी परीक्षा व त्या परीक्षेत ज्या महिला, मुली उत्तीर्ण होतील अशांना प्रशस्तीपत्रक देण्यात येते. या वर्गात शिकलेल्यापैकी अनेक महिलांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू केले आहे.

**बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग :** या वर्गाला एकूण १२ मुली होत्या. मार्च २००१ मध्ये मुलींचे वार्षिक पाठ होते. हे पाठ पाहण्यास परीक्षक म्हणून श्रीमती पुष्पाताई गुप्ते, श्रीमती शुभदाताई बदामीकर, श्रीमती पुष्पाताई जबडे, तसेच श्रीमती आशाताई लिमये यांना बोलविले होते. याच महिन्याच्या सुरवातीला हिंगणे येथिल शिशुविहार दाखविण्यास श्रीमती पुष्पाताई गुप्ते मुलींना घेऊन गेल्या होत्या. या वर्गाला आणखीही काही संस्था दाखविण्यात आल्या. बालग्राम, अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी, ममता बालसदन-सासवड, अभिनव शिशुमंदिर, लोढा बालक मंदिर अशा या संस्था होत. या मुलींनी संक्रांत उत्सवात पूजनीय अहिल्याबाई होळकर यांचा पोवाडा अतिशय उत्कृष्टपणे सादर केला. वार्षिक परीक्षेला सर्व मुली चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या. प्रशिक्षणवर्ग संपल्यानंतर सगळ्यांनी नोकरीसाठी प्रयत्न केले. त्यापैकी दहा जणींना बालवाडी-शिक्षिका म्हणून काम मिळाले आहे.

**होमनर्सिंग :** जानेवारी २००१ मध्ये झालेल्या भूकंपानंतर गुजरातमध्ये भचाऊ या गावी, प्रशिक्षण वर्गामधील ५ मुली व शिक्षिका सौ. नयना मराठे यांनी अतिशय उत्तम कामगिरी केली. मुलींना खूप चांगले अनुभव मिळाले. या सहाजणींबरोबर आपले कार्यकर्ते डॉ. विनेश नगरे हेही गेले होते. एक नवीन अनुभव सर्वांना मिळाला.

नवीन प्रशिक्षणवर्ग २० जुलै २००१ रोजी सुरू झाला. यंदा या वर्गाला ३४ मुलीं व महिलांनी नावे नोंदविली नावे नोंदवलेल्या सर्व मुली प्रशिक्षण वर्गात अगदी समरसून गेल्या आहेत. या वर्षी आठवड्यातून तीन दिवस वर्ग संपल्यावर एक तास एखाद्या पुस्तकाचे वाचन, एखादे चरित्र, एखाद्या संस्थेची माहिती दिली जाते. श्री. कवठेकर सरांनी 'महिलांची अस्मिता', श्री. शिरीष पटवर्धन सरांनी 'किरण बेदी', श्री. लवळेकर सरांनी 'आपली प्रार्थना', श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी 'जिजामाता चरित्र' असे विषय मांडले. किरण बेदीची माहिती मिळाल्यानंतर 'आय डेअर' या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे वाचनही झाले. याशिवाय महिन्यातील दोन शुक्रवारी वर्धिनीत चालणाऱ्या सर्व महिलावर्गाचे एकत्रीकरण होऊन कुष्ठरोग, एड्स, कॅन्सर या सर्व विषयांवरच्या फिल्म दाखवून त्याची माहिती दिली गेली. त्याचप्रमाणे श्री. डॉ. विनेश नगरे यांनी 'आपले आरोग्य' हा विषय मांडला. जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. पंडीतराव कुलकर्णी यांनी 'बँकेचे व्यवहार व आपली गुंतवणुक व बचत' हा विषय मांडला. स्वतःच्या अभ्यासक्रमाबरोबरच अनेक विषयाच्या अभ्यासाचा लाभ या मुलींना इथे होतो. कोर्समधील अकरा विषयाचे शिक्षण दोन भागात होते. प्रात्याक्षिक व लेखी. दर आठवड्याला मुलींची परीक्षा घेतली जाते. पाच महिन्यानंतर के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये एक महिना प्रॅक्टिकल असते. त्या एक महिन्यात मुली अनेक गोष्टी शिकतात. अनेक अनुभव त्यांना मिळतात.

**प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी वीरताच आपल्या आत्म्यांना उन्नत बनवील, त्यांचा विकास करील.**

**निटींग :-** निटींगच्या कोर्सला चार महिलांनी प्रवेश घेतला. त्यातील एकीने आता मशिन खरेदी करून व्यवसाय सुरू केला आहे.

**प्रौढ शिक्षण वर्ग :** या वर्गाला संख्या कमी आहे. मुस्लीम महिला व मुली मिळून पाच, तसेच मराठी महिलांची चार अशी एकूण नऊ संख्या आहे.



**फॅशन्स डिझाईनिंग कोर्स :** जुलैमध्ये सुरू झालेल्या या वर्गाला ९ संख्या आहे. या मुलींच्या मार्गदर्शनामध्ये प्रत्यक्ष काम करून घेण्यावर अधिक भर दिला जातो. गेल्या सात वर्षात अनेकांना या वर्गाचा लाभ झाला आहे. अनेक जणी आता आपल्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. आपल्या कुटुंबाचा आधार बनल्या आहेत. भुलेश्वर, उरळीकांचन मधील निसर्गउपचार केन्द्र, प्रयागधाम, थेऊर, रामदरा अशा पाच ठिकाणी सहल झाली. सहलीत वर्धिनीची पद्ये म्हणताना मुली रमून गेल्या होत्या. राखी पौर्णिमेला अपंग कल्याणकारी संस्थेला भेट दिली. या मुली व महिलांचे सर्व सण इथे साजरे केले जातात. त्यात मुली खूप रमून जातात. महिला म्हणतात, इथे माहेरी आल्यासारखे वाटते.

**कौटुंबिक सल्ला केन्द्र :-** दर मंगळवारी दुपारी ४ ते ६ या वेळात ॲड. सौ. बापट या येतात. या वर्षी दोन कुटुंबात तडजोड झाली आहे. घटस्फोट टळला आहे. ही विशेष आनंदाची बाब आहे. तीन केसेसचे काम चालू आहे, पैकी दोन कोर्टात सुरू आहेत.

**माता बाल संगोपन केन्द्र :** या केन्द्राच्या वतीने चालणाऱ्या पोलिओ निर्मूलन उपक्रमाचा अनेक बालकांना लाभ झाला आहे. दर बुधवारी व शनिवारी दुपारी २ ते ४ या वेळात या केन्द्रात वास्तूच्या समोरील वस्तीतील महिलांची, मुलांची तपासणी केली जाते व औषधोपचारही केला जातो. कौटुंबिक सल्ला केन्द्राच्या वतीने महिला तर कुटुंब नियोजन ऑपरेशन करून घेतातच; पण पत्नी अशक्त आहे म्हणून के.ई.एम मध्ये जाऊन दोन पुरूषांनीही नसबंदी करून घेतली.

**मुस्लीम महिलांमध्ये हळूहळू काळाला धरून जागृती होत असल्याचे जाणवते आहे. एक मुस्लिम मुलगी होमनर्सिंगला प्रवेश घेण्यासाठी मे २००१ मध्ये आईबरोबर आली. आपला वर्ग साधारण जुलैमध्ये सुरू होतो. तर मधल्या काळात काय करायचे, घरात बसून राहणे नको होते. कारण घरात दिसली की घरांतील मंडळी तिच्या लग्नाचा आग्रह धरतील म्हणून वर्धिनीत त्या कालावधीमध्ये सुरू असलेल्या संगणक वर्गात तिने नाव घातले. तिच्या आईने सांगितले की, तिने तिच्या दोन मुलींची फार घाई करून लग्ने केली. अन् त्यांच्या आयुष्याचं वाटोळं केले. त्या दोन्ही मुली आता घरीच आहेत. सासरी नांदवून घेत नाहीत म्हणून जे जे ज्ञान मिळेल ते ते मी या मुलीला देण्याचा प्रयत्न करणार आहे. ज्यायोगे ती तिच्या पायांवर उभी राहील. म्हणून होमनर्सिंग सुरू होईपर्यंत तिला अभ्यासक्रम करू दे. तिने संगणकाचा एम. एस. ऑफिस चा अभ्यासक्रम पुरा केला. त्यानंतर होमनर्सिंगला नाव घातले.**


**तुमच्यामधील ईश्वरत्व प्रकट करा, मग त्याच्या भोवती सर्व गोष्टींची सुसंगतपणे जुळणी होऊन जाईल.**

**शारदामणि महिला विभाग अभ्यासवर्ग :-** आपले काम अधिक प्रभावी करायचे असेल तर संस्थेच्या अंतर्गत प्रशिक्षण वर्गांची, अभ्यासवर्गांची आवश्यकता असतेच असे कार्यक्रम ही नित्याचीच गोष्ट आहे. याच्या जोडीला अन्य सामाजिक संस्थांनी आयोजित केलेल्या अभ्यासवर्गांना कार्यशाळांना आपल्या कार्यकर्त्यांना पाठविण्याचेही लाभ होतात असा अनुभव आहे. यावर्षी वनस्थळी ग्रामीण विकास केंद्राच्या वतीने बालवाडी, अंगणवाडीच्या शिक्षिकांसाठी एक प्रशिक्षण वर्ग नोव्हेंबर महिन्यात आयोजित केला होता या वर्गाला वर्धिनीच्या पाकोळी बालवाडीतील दोन शिक्षिका गेल्या होत्या. बालांसाठी नवीन गाणी, सुशोभनाच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण, अशासारख्या उपयुक्त प्रशिक्षणाचा लाभ झाला आहे असा अनुभव आहे. शारदामणि महिला विभागांतर्गत काम करणाऱ्या दोन महिला कार्यकर्त्या भारतीय स्त्री शक्ती जागरण संस्थेच्या अधिवेशनाला नाशिक येथे गेल्या होत्या. 'स्त्री'कडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन कसा आहे आणि कसा असायला हवा, सबलीकरण शब्दाच्या संस्काराऐवजी स्त्री शक्ती जागरण अशा प्रकारच्या शब्दांच्या संस्कारांची गरज, जागतिकीकरण आणि महिला, ताकद अल्पबचत गटांची, बाललैंगिक शोषण, दहशतवाद व महिला, अशा अनेक विषयांवर झालेली प्रबोधनसत्रे, अनुभवकथन, गटचर्चा, वर्धिनीच्या कामाला खूप उपयुक्त होतील, असा विश्वास घेऊन या दोन महिला कार्यकर्त्या परत आल्या.

बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाला यावर्षी फक्त पाच मुलींनीच नावे घातली. संख्या जमत नाही म्हणून मी त्यांना म्हटले की, अन्य एखाद्या संस्थेत मी तुम्हाला प्रवेश मिळवून देते. कारण यंदा आपण हा अभ्यासक्रम घेणार नाही. संख्या फार कमी आहे म्हणून. त्यावर त्या पाचजणी पैकी तिघीजणी म्हणाल्या आम्हाला वर्धिनीत अभ्यासक्रम करण्याची परवानगी मिळाली आहे. 'आमचे घरातील आम्हाला दुसरीकडे पाठवणार नाहीत. पाहिजेतर आम्ही दुसरा अभ्यासक्रम करतो. आम्हाला वर्धिनीत येण्यास परवानगी मिळाली आहे, तर आम्ही काही तरी शिकून घेऊ' असे म्हणून त्या तिघींनी होमनर्सिंगला नाव घातले, तर बाकी दोघींचे पालक येऊन भेटले व म्हणाले की, बालवाडीच्या शिक्षिकांच्या हाताखाली त्या काम करतील. त्या दोघींना मुलांची भारी आवड आहे. तुम्ही नाही म्हणू नका. सध्या त्या दोघी बालवाडीच्या शिक्षिकांना मदत करतात.

**'पाकोळी'**

संक्रांत उत्सवाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक शरद वाघ आले होते. बालशाखेतील मुलांनी वेळेचे महत्त्व या विषयावर एक संगीतिका सादर केली. बालवाडीमध्ये दर महिन्याला त्या त्या महिन्यातील मुलांचे



वाढदिवस साजरे केले जातात. या वाढदिवसांमधे मुलांचे औक्षण केले जाते. छोटा संकल्प केला जातो आणि छोटेसे बक्षिस दिले जाते. या वर्षी मोठ्या गटातील पालकांनी एक समारंभ करून मुलांवर जे काही चांगले संस्कार केले गेले आहे, याबद्दल

**प्रत्येक पुरुष, प्रत्येक स्त्री, प्रत्येक जीव म्हणजे ईश्वराचे एक रुप आहे असे समजा.**

कृतज्ञता व्यक्त केली. बालवाडीसाठी ८०० रूपये किंमतीचा खेळ भेट दिला. सुटीच्या काळात शिक्षिकांनी मोठ्या गटाचे छंद वर्ग घेतले. छंद वर्गात केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवून पालकांना पहायला बोलविले होते. बालवाडीची सहल कात्रज व सारसबाग या ठिकाणी नेण्यात आली. गुढीपाडव्याच्या दिवशी घरी गुढी का उभारतात, याची गोष्ट सांगितली. प्रकल्प तयार केला. १ जूनला सर्व शिक्षिका सुटीहून परत येऊ लागल्या. त्या दिवशी वार्षिक नियोजन बैठक घेण्यात आली. सानेगुरूजी स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या गोष्टी सांगण्यात आल्या.

पालखी सोहळ्यात बालशाखा व बालवाडी या दोघांनी मिळून हरिनामाच्या गजरामधे पालखी वर्धिनी ते विठ्ठलाच्या मंदिरापर्यंत वाजत-गाजत नेली.

गुरूपौर्णिमेच्या दिवशी मोठ्या गटातील काही मुलांनी मधल्या गटात येऊन वर्ग घेतले.

दीप अमावस्या ही वर्धिनीच्या खालील सभागृहात सर्व प्रकारचे दिवे आणून त्या दिव्यांपुढे सुंदर रांगोळी काढून, दिव्याचे महत्त्व काय, ही गोष्ट सांगण्यात आली.

लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त टिळकांची प्रतिमा समोर ठेवून त्यांची पूजा करून मुलांनी टिळकांच्या गोष्टी सांगितल्या.

गोपाळकाला गटातील मुलांनी 'गोविंदा आला रे' हे छोटेसे नाटक सादर केले. तर मधल्या गटाने 'बांधा उखळाला' हे अभिनय गीत सादर केले. परंतु त्यापूर्वी कृष्णातील वेशातील व राधेच्या वेशातील मुला-मुलींची मिरवणूक काढण्यात आली.

१५ ऑगस्ट या दिवशी ध्वजवंदनाला आलेल्या बालवाडीतील मुलांसमोर बालशाखेच्या मुलांनी देशभक्तीपर गाणे म्हटले.

गांधीजयंतीला वर्गामध्ये बापूजींच्या गोष्टी सांगितल्या.

नवरात्रामध्ये प्रत्येक विभागाचा एक भोंडला होत होता. आपट्याची पाने का वाटतात याची गोष्ट सांगण्यात आली. दिवाळीच्या सुटीपूर्वी संपूर्ण इमारतीत रांगोळी काढून मुलांनी तयार केलेल्या आकाशकंदिलांनी इमारत सजवली. मुलांनी आणलेले फुलबाज्या, भुईचक्र, झाड हे फटाके उडविण्यात आले. नंतर सर्वांना मिठाई देण्यात आली.

**With Best Compliments From :**

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD.,**

**Plot No. 4, S. No. 17/1 – B, Kothrud Industrial Estate,**


**Kothrud, Pune - 411 029 Phone : 5441124, 5440480, 5464551**

**तुम्ही कुणाला मदत करु शकत नाही; तुम्ही फक्त सेवा करु शकता;**

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २००१

**'विकसता विकसता विकसावे' : -**

दि. २८ ऑक्टोबर २००१. स्थळ- 'स्व'-रुपवर्धिनीचे सभागृह. प्रसंग- स्पर्धा परीक्षा केंद्राचा प्रथम वर्धापनदिन. सर्व विद्यार्थी, हितचिंतक, शिक्षक आले होते. 'समाजपरिवर्तनाच्या गप्पा मारण्यापेक्षा स्वतःमध्ये परिवर्तन घडविणे अधिक महत्त्वाचे आहे', असे मनोगत सोमनाथ सलगर मांडत होता. मी मात्र स्वतःशी संवाद साधत होते. 'सामाजिक जाणिवेचे नेतृत्व तयार करणे' हा संस्थेच्या कामाचा गाभा आहे हे लक्षात घेऊन एक वर्षापूर्वी ज्ञानप्रबोधिनीच्या सहकार्याने केंद्र सुरु झाले. माझ्या मनात स्मृतीचित्रांचा 'स्लाईड शो' सुरु झाला. वर्षभरांतील घटना भराभर डोळयासमोर उलगडत गेल्या.



सुरुवातीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेसाठीचे दैनंदिन वर्ग सुरु झाले. पहिल्या तुकडीत ४७ जणांनी प्रवेश घेतला. पूर्वपरीक्षेच्या दैनंदिन दोन तुकडयांमधून १०० जणांनी भाग घेतला. तर नोकरी - व्यवसाय करणाऱ्यांसाठी एक जलद वर्गही घेण्यात आला. या वर्गासही चांगला प्रतिसाद मिळाला.

दैनंदिन मार्गदर्शनासोबत वेगवेगळया विषयांवर होणाऱ्या गटचर्चा, साप्ताहिक उपासना यांतून विद्यार्थ्यांशी जास्त संवाद साधता आला. वर्गासाठी पुणे शहरातील तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळया जिल्हयातून मुले आली आहेत. कुणी नांदेडहून, कुणी धुळे, मालेगांव, सातारा, सांगली, कोल्हापूर, गडचिरोली, लातूर इ. ठिकाणांहून. घरापासून दूरवर केवळ अभ्यासासाठी आलेल्या या विद्यार्थ्यांच्या इतर गोष्टींकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. मुलांचे वाढदिवस वर्गामध्ये साजरे केले जातात. या दिवशी ते संकल्प करतात. या देशाचे रुप पालटावे, भारताचा महान भारत व्हावा. आमच्या रक्तात विजेयेच्छा बाणावी आणि सचोटीचा, प्रामाणिकपणाचा शासकीय कारभार ही अपवादात्मक गोष्ट न राहता सर्वसाधारणपणे ते प्रशासनाचे गुणवैशिष्टय ठरावे, याची जाणीव विद्यार्थ्यांना वेगवेगळया निमित्ताने करुन देण्यात येते. आदरणीय पटवर्धन सरांच्या भाषेत सांगायचं झालं तर 'माझ्या डोळ्यात पाणी आलं ही झाली वेदना' 'दुसऱ्या कुणाला काटा टोचला आणि माझ्या डोळयात पाणी आलं ही झाली संवेदना' फक्त मी आणि माझा यांत आपल्या सगळयांच्याच आतली संवेदना कुठेतरी गोठत चाललीय. तिला 'आम्ही' या शब्दाची ऊब देऊन पुन्हा चेतवणं गरजेचं आहे. त्यासाठी 'स्पर्धा परीक्षा केंद्राने' खारीचा वाटा उचलला आहे.


*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**INTERNATIONAL TRADE SYNDICATE**

Dealers in Dyes, Chemicals and sizing materials

93/95, Perin Nariman Bazargate Street, Fort, Mumbai - 4000 001.


Tel. : 2610176, 2622901.


**सेवेची संधी इतरांना न मिळता तुम्हाला मिळाली याबद्दल स्वतःला धन्य माना.**

# वेदना जाणवाया जागवू संवेदना....

सौ. नयना मराठे

२६ जानेवारी २००१. सकाळची वेळ. दूरदर्शनवर दिल्लीची संचलन दृश्यं दाखवली जात होती आणि मध्येच तळटिपेमध्ये गुजरातसह संपूर्ण देशाला हादरवून टाकणारे गुजरातच्या भूकंपाचं वृत्त दिसू लागलं. दिवसाअखेरीला भूकंपाच्या तीव्रतेची कल्पना आली. पण तोपर्यंत बरंच काही घडून गेलं होतं. मृतांचा आकडा वाढत चालला होता. दूरदर्शन आणि वृत्तपत्र यातून अत्यंत करूण कहाण्या समोर येत होत्या. मन अस्वस्थ होत होतं.



काही दिवसांनी वर्धिनीत पुष्पाताईंनी विचारलं 'गुजरातमध्ये मदतकार्याकरता जाणार का?' तिथंच होकार दिला. त्या दिवसापासूनच तिकडे जाण्याची उत्सुकता वाढू लागली. वर्धिनीच्या होम नर्सिंग कोर्सचं नुकतचं प्रशिक्षण घेतलेल्या तीन विद्यार्थिनी सोबत येणार होत्या.

दिवस जात होते. आम्ही निरोपाची वाट पहात होतो. विद्यार्थिनीपण सारख्या चौकशी करत होत्या. कारण एकच, काम करण्यासाठी स्फुरण चढलं होतं.

अचानक एक दिवस पुष्पाताईंनी सांगितलं. पुढच्या आठवड्यात रविवारी दुपारी निघायचं आहे. आता अचानक माझाच विचार डळमळू लागला. घरातले सगळे प्रश्न समोर उभे राहू लागले. जरा टेन्शनच आलं होतं. परंतु माझ्या पतींनी धीर दिला. त्यांनी सांगितल 'तू निर्धास्त जा. आम्ही आमचं पाहू.'

रविवारी दुपारी ४ वाजता प्रसन्न ट्रॅव्हल्स्‌नं निघालो. आमच्याबरोबर संघाचे ज्येष्ठ कार्येकर्ते श्री. सुहासराव काणे आणि वर्धिनीचे डॉ. विनेश नगरे हेही होते. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वा अहमदाबादला पोहोचलो. डॉ. हेडगेवार भवनमध्ये आमची अतिशय चांगली व्यवस्था झाली. तिथे विलक्षण शांतता आणि स्वच्छता होती. वातावरण प्रसन्न होतं. जेवणाची व्यवस्था विश्व हिंदू परिषदेच्या कार्यालयात केलेली होती. तेथून आम्ही डॉ. भरत अमीन यांच्या हॉस्पीटलमध्ये गेलो. स्वतः डॉक्टर आणि त्यांचे सर्व सहकारी येथूनच सामान आणि कार्यकर्ते पाठविण्याची व्यवस्था करीत होते. हे हॉस्पिटल छोटसं पण पाहण्यासारखं आहेच.

गाडीत एवढं सामान होतं की पाय ठेवायलासुध्दा जागा नव्हती. पण आता आम्ही काम करायला निघालो होतो. अशा बारीकसारिक गोष्टींचा विचार मनात आणणंही योग्य नव्हतं. गाडीचं 'भचाऊ' कडे प्रस्थान झालं. 'भचाऊ' अहमदाबादपासून पावणे चारशे किलोमीटरवर आहे. तेथे आम्ही रात्री साडेआठला पोहोचलो.

गावाच्या अलिकडे दोन ते अडीच किलोमीटर लांबीचा पूल आहे. तो बराच खचलेला होता. भेगा पडलेल्या होत्या. जणू स्पीडब्रेकरचं! पुलावर एकेरी वाहतूक होती. वाटेत मिठागरंही दिसत होती. पाणी

**ही सेवा म्हणजे ईश्वराची पूजा होय ही भावना ठेवूनच सेवा करा.**

ओसरलेल्या खाडीमध्येच एक मोठा खड्डा पडलेला होता. त्यात थोडं पाणी होतं. पण त्या पाण्यात थोडे हिरवे निळे रंग पसरलेले होते. जागोजागी माती खणल्यासारखी वाटत होती. रस्त्याच्या मध्यभागी मोठमोठ्या भेगा दिसत होत्या. कडेला असलेल्या डोंगराचा एक भागही खचलेला होता.

आम्ही तंबूत पोहोचलो. स्थिरस्थावर झालो. थोडया वेळानं प्रार्थना झाली. प्रत्येकानं आपली स्वतःची ओळख करून दिली. प्रमुख डॉक्टरांनी आम्हाला कामासाठी शुभेच्छा दिल्या. नंतर आम्ही जेवणासाठी जेवण्याच्या तंबूमध्ये गेलो. प्रार्थना झाली. जेवणाला सुरवात करणार तोच मोठा आवाज झाला. सगळं हलू लागलं. जणू शंकराचं तांडव नृत्यचं! आमची भीतीनं अगदी गाळण उडाली. मोठयानं ओरडायचंच बाकी राहिलं होतं. मी तर माझ्या शेजारी बसलेल्या कार्यकर्तीला घट्ट धरलं. काही क्षणातच तांडव ओसरलं. आम्ही सावरलो. माझ्या मनात आलं 'आपल्याला सर्व कल्पना असतानासुध्दा आपण असं का वागलो? मग ज्यांना काहीही कल्पना नव्हती आणि ज्यांनी अशा प्रसंगाला तोंड दिलं, त्यांचं काय झालं असेल!'

रात्री बॅटरी घेऊन सावधपणानं झोपलो. त्या रात्री कोणीही पेशंट आले नाहीत. सकाळ झाली. तंबूच्या बाहेर आलो. आजूबाजूला पहात होतो सगळीकडे फक्त विटा माती यांचे भग्न अवशेष. उभ्या इमारती तिरक्या झालेल्या आणि असंख्य तडे गेलेल्या.

चहा घेऊन कामाच्या ठिकाणी उपस्थित झालो. थोडे पेशंट होते. त्यांच्यावर उपचार केल्यानंतर समोरच्या गल्लीत एक चक्कर मारावी म्हणून बाहेर पडलो. सगळीकडे मातीचे ढिगारे. फ्रीज, पंखे, सुंदर टाईल्स सगळं उध्वस्त झालेलं. एका घराजवळ दोन पुरूष बसण्यापुरती जागा साफ करून बसलेले दिसत होते. नजर शून्यात लागलेली. आम्ही जवळ गेलो. त्यांना काही विचारणार तोच ते रडायला लागले. पुरूषांची ही अवस्था तर बायकांची अवस्था सांगणेच नको. अगदी सात आठ वर्षांची मुलेही अकाली प्रौढ झाल्यासारखी वाटली. एक दोन मुलं त्याच ढिगाऱ्यात आपला चेंडू शोधत होती. कुठ मिळणार होता त्यांचा चेंडू! थोडं भानावर आल्यावर ती माणसं सांगू लागली- या इथेच त्यांच एक हसतंखेळतं घर होतं. एकेक पैसा गोळा करून वडिलांनी आणि त्यांनी हे सर्व उभं केलं होतं. वडिलांची तर आयुष्याची कमाईच गेली. आयुष्यभर घाम गाळला, रणरणत्या उन्हात कष्ट केलं, आणि हे सारं उभं केलं. आणि आता जणू कोणीतरी दुष्ट शक्तीनं या साऱ्यांवर नांगर चालवला होता. नशीब एवढंच की हे रात्री झालं नाही. सकाळ असल्यामुळे सगळे आपल्या उद्योगाला लागलेले. २६ जानेवारी असल्यामुळे मुलं शाळेत गेलेली. त्यातील काही परत आली आणि काही ठिकाणी काही परत आलीच नाहीत. एकजण सांगत होता, 'माझी आई आज सात वर्षे पॅरेलिसिस मुळे निजून आहे. ती अंगणातच बाजेवर होती म्हणून वाचली. पण चालते बोलते वडील मात्र वरच्या मजल्यावर होते, धावतच खाली आले, आणि बाहेर पडणार तोच त्यांना खाली आणणारा जिनाच त्यांच्या छातीवर कोसळला. त्यातच ते गेले.' तो स्वतः त्या दिवशी गिरणीमध्ये जाण्यासाठी पाच मिनिटे लवकर बाहेर पडला म्हणून वाचला. मुलं शाळेत जायचं म्हणून रस्त्यावर आली आणि त्यांना पोचवायला आई बाहेर आली म्हणून सर्व वाचले. तो पुरूष ढसढसा रडत होता. आमच्याही डोळ्यांत पाणी आले. आमच्याकडून घालता येईल तेवढी आम्ही समजूत घातली.

अशी अनेक उदाहरणं. अनेक कथा आणि वेगवेगळ्या व्यथा. सगळं सुन्न करणारं. पडलेल्या घराची वाट तयार करणारा १५-१६ वर्षांचा मुलगा जागची वीट उचलून पुन्हा त्याच जागी ठेवत होता आणि त्याचा धाकटा भाऊ ढिगाऱ्यात वह्या-पुस्तकं शोधण्याचं काम मन लावून करत होता. मोठ्या ढिगाऱ्यापुढे छोट्या तंबूत आपला वाचलेला मोडकातोडका संसार मांडण्याचा असफल प्रयत्न करणारी गृहिणी

**ज्याचे हृदय गरिबांसाठी कळवळते, ज्याच्या हृदयाला गरिबांसाठी पीळ पडता त्यालाच मी महात्मा म्हणतो; एरव्ही तो दुरात्माच होय.**

अशी अनेक दृश्य आम्ही पहात होतो.

गावातली जनावरं मोकाट फिरत होती. माणसं पाहिली की जवळ येत होती. आम्ही मात्र दूर पळत होतो. भितीनं! मुकी बिचारी, काहीतरी खायला मिळेल या आशेनं, पाणी प्यायला मिळेल या आशेनं वेड्यासारखी वणवण फिरत होती. कदाचित आपल्या न सापडणाऱ्या मालकाचा शोध घेत होती.

रूग्णालयाच्या तंबूत परत आलो. दिवस भरत आलेली एक बाई पेशंट म्हणून आली होती. बरेच दिवस अंगाला पाण्याचा स्पर्श नसल्यानं तिच्या अंगाचा अत्यंत घाणेरडा वास येत होता. तिला तपासलं आणि सांगितलं की अजून दोन ते तीन दिवस लागतील. घरी गेलात तरी चालेल. पण ती रडायलाच लागली. म्हणाली 'कोणत्या घरी जाऊ? ज्या घरात माझी पहिली तीन मुलं गेली तिथंच परत जाऊ? मला आता हे मूल पाहिजे.' आम्ही तिला समजावलं. कसंबसं थोडं शांत करून घरी पाठवलं.

दुसरी एक बाई रात्रीच्या वेळी आपल्या सासू-नवऱ्याबरोबर बाळंतपणासाठी आली. तिला आम्ही सांगितलं की 'आता होशील तू. इथंच रहा. रात्रीतून कुठे धावपळ कराल!' तर ती रहायला तयार होईना. नवऱ्यानं सासूनं समजावून पाहिलं. पण ती एकटी रहायला तयार होईना. घरी जाण्याचा हट्ट करू लागली. भूकंपानं सर्व एवढे भेदरले होते की, ते एकमेकांना सोडायला धजावत नव्हते.

लहान मुलं ड्रेसिंगला आली की खूप रडायची. सगळ्यांच्या जखमा खूप चिघळलेल्या होत्या. ड्रेसिंग करताना खूप त्रास होत होता. मग त्यांना गोळ्या देऊन, थोडा दम देऊन आणि शेवटी आईवडिलांनी धरून ठेवून त्यांचं ड्रेसिंग चाललं होतं. अखेरीला 'उद्या परत येणार नाही' या बोलीवर ते ड्रेसिंग करून घेत होते.

एक बाई चालूच शकत नव्हती. जवळजवळ १५ ते १६ तास ती ढिगाऱ्याखाली अडकून पडली होती. एकाच अवस्थेत राहिल्यामुळे तिच्या पायातली ताकद गेली होती. तिला शेवटी मोठ्या डॉक्टरांनी वॉकर देऊन चालवून पाहिलं. लहान मूल पहिल्यांदा चालायला लागल्यावर जो आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसतो, तोच आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता.

दिवसभराच्या कामानं थकवा आला होता. श्री. काणे सरांच्या बरोबर आम्ही बाहेर फेरफटका मारण्यासाठी निघालो. सगळी दृश्यं तशीच होती. वाटेत एक मोठी इमारत लागली. लांबून छान वाटली. जवळ गेल्यावर तिथल्या लोकांनी सांगितलं की ही इमारत पाच मजली होती. पार्किंगसह दोन मजले जमिनीत पूर्णपणे घुसले होते. इमारतीत पार्किंगमधे ४-५ मोटारी होत्या.आणि फ्लॅटमध्ये काही महिलाही होत्या. सर्वच खाली गेले. मदतीकरता आलेल्या रशियन टीमनं बायकांना शोधून काढलं. पण खूप उशीर झाला होता. शेजारच्या सहा मजली इमारतीत वरच्या मजल्यावर काहीजण अडकले होते. एका युवकानं अचाट धाडस केलं. साड्यांना साड्या बांधल्या आणि १७ जणांना खाली आणलं. त्या साड्या अजून त्याच अवस्थेत लोंबत होत्या.

जवळच्या एका मंदिरात हात जोडून प्रार्थना करीत असणारा भक्त तसाच गाडला गेला. अनेक दिवसांनी हात जोडलेल्या, मांडी घातलेल्या स्थितीतील त्या भक्ताचा मृतदेह बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी बाहेर काढला. देवीची मूर्ति मात्र अभंग होती. ती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी तंबूत आणून ठेवली. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचे काम वाखाणण्यासारखेच होते. पेशंट उचलण्याकरता एकाला हाक मारली, तर चार जण धावून येत होते. दिवसभराची जेवण्याची व्यवस्था त्यांच्याकडेच होती. पाण्याची व्यवस्थाही तेच पहात. खाऱ्या पाण्याचे टँकर यायचे. कार्यकर्ते ते सिमेंटच्या टाक्यामध्ये भरून घेत होते. हे पाणी वापरण्यासाठी होते. प्यायला मात्र बिसलेरीचं पाणी असायचं. पटेल नावाचे कार्यकर्ते फक्त पाणी पुरवायचे.

**तुम्ही आपल्या बांधवांवर प्रेम करता काय? ईश्वराला आणखी कुठे शोधाल?**

जेवल्यावर पाण्याची एक लहानशी पिशवी मिळायची. पावडरच्या दुधाचा चहा मिळायचा. कार्यकर्ते तो अगदी गरमागरम द्यायचे. सोबत हवी तेवढी बिस्कीटे देत. बजरंग दलाने जेवणाची व्यवस्था जास्तीत जास्त चांगली ठेवण्याचा प्रयत्न केला होता. बटाट्याचा रस्सा आणि मऊ खिचडी हा मेनू सतत असायचा. सोबत लोणचं असे. कधीतरी रोटीही असे. हे सारे जेवण पत्रावळीवर मिळायचे.

तंबूमध्ये पुरुष आणि बायका अशी स्वतंत्र व्यवस्था नव्हती. सतत आज एक टीम निघाली की उद्या दुसरी येत असे. ‘कोलकता’वाल्या टीमला तोडकेमोडके बंगाली बोलले की बरं वाटत होतं. आम्हीही त्यांना मराठी शिकविण्याचा तोडकामोडका प्रयत्न केला. हिस्सारवरूनही एक टीम आली होती. आम्ही सर्वांनी भरपूर काम केलं. काम करताना खूप शिकायला मिळालं. तुटपुंजी साधने असताना आणिबाणीत काय करावे ते समजले. एकदा एका रात्री, मांडीला ॲबसिस (गळू) झालेली एक बाई आली होती. पुण्याचे भूल देणारे एक डॉक्टर आणि ऑपरेशन करणारे एक डॉक्टर यांनी ते कापून काढले. त्यांना मी मदत करत होते. तिला भूल दिलेली होती. तिच्या नवऱ्याने डॉक्टरांचे पाय धरायचेच बाकी ठेवले होते. एवढा तो भावनावश झाला होता. शुध्दीवर आल्यावर ती बाई जोरात बडबडू लागली. तिच्या नवऱ्याला आम्ही विचारलं की ती काय बोलते आहे? तो म्हणाला, ती म्हणतेय की, “पळापळा हे सगळं हलतंय”. भूकंपाने बिचारे एवढे भेदरलेले होते.

मोठमोठे डॉक्टर्स तंबूमध्ये आमच्या बरोबरच रहात. आम्ही अंताक्षरी खेळायचो. गाणी म्हणायचो. थोडा वेळ वातावरण बदलायचं. मूळच्या गुजरातमधल्या, पण आता लंडनमधे रहाणाऱ्या दोन सिस्टर्स आमच्याच तंबूमध्ये आल्या होत्या. त्यांनी मुलांसाठी भरपूर कपडे, खेळणी, बिस्किटे, औषधे आणली होती. नवीन बाळ जन्माला आलं की त्या कपडे, खेळणं त्या मुलाच्या आईजवळ देत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांचे कार्यकर्ते - जे डॉक्टर्स, इंजिनिअर्स होते - या सर्वांनी खूप चांगले कार्य केले. ते आपला वेळ जास्तीत जास्त देत होते, तो हॉस्पीटल उभारण्यासाठी. तात्पुरते लोखंडी स्क्रू फिटिंग करून मोठमोठे डोम उभारून त्यावर प्लॅस्टिक टाकून हे हॉस्पीटल उभे करत होते. काहीजण तंबूचे नगर उभारून भूकंपग्रस्तांसाठी रहाण्याची व्यवस्था करत होते. जी आवश्यकता असेल ती पुरी करायची असं हे काम चालले होते. रात्रंदिवस अगदी अथकपणे.

आमच्या बरोबर आलेले आमचे वर्धिनीचे कार्यकर्ते - जे चांगले डॉक्टरही आहेत - सर्वच सेवाकार्य अत्यंत समरसून करत होते. डिलिव्हरीच्या केसेसमध्ये श्रम पडत. पण ते सर्व उत्साहानं करतं. त्याच उत्साहानं आमच्याबरोबर गाणी म्हणत. वेळेला सर्वांच्या बॅगा उचलण्यापासून ते सोलर प्लांट उचलण्यापर्यंत सर्व कामं मन लावून करत. अन्य डॉक्टरांना ज्या सोयी सुविधा मिळाल्या त्या मलापण मिळाल्या पाहिजेत, असा आग्रहही त्यांनी कधी धरला नाही! सर्वांनाच या कार्यकर्त्यांची सेवावृत्ती जाणवल्यामुळे, रात्रीच्या वेळी बॅटरी लावून त्यांना शोधून काढत आणि इमर्जन्सीकरता घेऊन जात. सकाळी बघावं, तर परत जोमानं सर्वांच्या बरोबरीनं कामात मग्न झालेले दिसत. रात्रीच्या थकव्याचं जराही कोठे चिन्ह नसे.

अनेक प्रसंगांमधून, त्यांनी आपल्या चांगल्या वर्तुणुकीची, चांगल्या कार्यपध्दतीची, चांगल्या विचारांची मूळ बैठक किती चांगली आहे हे दाखवून दिलं. अर्थात याचं कारण म्हणजे ‘स्व’-रूपवर्धिनीचे संस्कार हेच होतं आणि असं हे संस्कारधन हीच मला वाटतं - आमच्या थोड्याफार कामाची प्रेरणा होती.

❖ ❖ ❖

**हे जे सर्व गरीव, दुःखी व दुर्बल आहेत तेच ईश्वर नव्हेत काय? आधी त्यांची पूजा का करत नाही?**

# तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला ।
# तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥

***कोठेवाडीमध्ये महिला, वृध्द, बाल यांच्यावर दरोडेखोरांनी अनन्वित अत्याचार केले. ही बातमी वाचल्यानंतर कार्यकर्त्यांच्या मनात अस्वस्थता उत्पन्न होणे स्वाभाविकच होते. आपण तेथे गेलेच पाहिजे या विचाराने उसळी घेतली. जायचेच पण जाऊन काय करायचे, काय करणे आवश्यक आहे,अग्रक्रमाचे काय आहे याचा विचार मात्र शांतपणे करण्याची गरज होती. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र बसून याचा विचार केला. साधारण काय करावे याची थोडी पूर्वतयारी केली. आणि मग युवक व युवती कार्यकर्त्यांची एक तुकडी त्या ठिकाणी रवाना झाली. केवळ ८-१० दिवसांच्या कालावधीत वर्धिनीत घेतलेल्या संस्कारांचा कृतीशील उपयोग करीत कार्यकर्त्यांनी बऱ्याच गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. ही तुकडी परत येताना गावकऱ्यांच्या, मुलांच्या डोळयातील भाव या सहवासाची पावती देत होते; पण तेथे गेलेल्या कार्यकर्त्यांच्या मनात तेथे जाताना, गेल्यावर, काम करताना आणि अगदी निघतानासुध्दा जी स्पंदने उठत होती; त्याचीच ही काही उदाहरणे -***

→ अत्यल्प पाऊस, पडीक जमीन बेरोजगारी, राजकीय अनावस्था ही कोठेवाडीची पार्श्वभूमी. उसतोडणीतून मिळणाऱ्या अवघ्या १०/१२ हजारांवर सर्व वर्ष ढकललं जातं. बहुतांश पैसा व्याजापोटीच जातो. या सगळ्याचा परिणाम-लहान मुलांच्या अंगावर अपुरी वस्त्रं, औषधोपचार अशक्य आणि कुपोषण. जेवणात फक्त बाजरीची भाजी आणि लाल मिरचीचा ठेचा.

सर्व तरूण मंडळी ऊसतोडणीसाठी दूरच्या गावांना गेल्याचा फायदा दरोडेखोरांनी घेतला. प्रचंड मारझोड आणि असह्य अत्याचारांना गावातले वृध्द स्त्रिया व मुलं यांना तोंड द्यावं लागलं. अशा स्थितीतही गावकऱ्यांच्या मनाची श्रीमंती मात्र फार मोठी आहे. आम्हा सर्व कार्यकर्त्यांवर त्यांनी अगदी पोटच्या मुलांसारखे माया केली. गावकऱ्यांनी खरं म्हणजे खूप सोसलं होतं. तरीसुध्दा आम्हा सर्वांची चहा-पाणी-भोजन याची व्यवस्था त्यांनी अत्यंत आपुलकीनं केली. रासने काका, चोरमले, पारगावकर सर, यांचं सहकार्य कमालीचं लाभलं. हे सगळंच कधीही न विसरण्यासारखं आहे.

→ कोठेवाडीची घटनाच वेगळी आहे. इथं पुण्यात सुरक्षित वातावरणात राहून 'आम्ही सबला आहोत' असा ठेंभा मिरवणं खूप सोपं आहे. पण कोठेवाडीसारख्या प्रकरणात 'आम्ही अबला नाही' असं म्हणण्याची हिंमतच होणार नाही. कुठंही काहीही झालं की आधी बायका भरडल्या जातात. ... कोठेवाडीच्या प्रकरणात कदाचित आरोपी पकडले जातील. त्यांना शिक्षाही होईल. पण ज्या बायका, मुली अत्याचाराला बळी पडल्या आहेत, त्यांना समाज, नातेवाईक स्विकारतील का? या प्रश्नाचं उत्तर कोण देणार? का सगळेच मूक गिळून बसणार? स्वयंसेवी संघटनांनीच हे आव्हान स्वीकारले पाहिजे. अन्यथा ह्या बायकांच्या भविष्यात फक्त काळोखच आहे.

कोठेवाडीत जाण्याच्या आधी या घटनेकडे अत्यंत सहानुभूतीनं; पण एका त्रयस्थाप्रमाणेच मी पहात होते. पण या चार दिवसात या वाडीत आणि माझ्यात एक भावनिक नातं निर्माण झालं आहे. या माणसांवर भयानक, अमानुष अत्याचार झाला आणि आपण काहीही करू शकत नाही, याची खंत मनात आहे.

**चारित्र्याचाच सर्व ठिकाणी जय होतो.**

ज्ञानेश भैय्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही कोठेवाडीचा फक्त 'कोरडा निरोप घेतला'.... डोळे सर्वांचेच कोरडे होते. आमचे, तिथल्या सर्व काही सोसलेल्या ताईंचेही. पण सर्वांचं मन मात्र आतून टाहो फोडत होतं.

कोठेवाडीचं प्रकरण समजलं. तिथल्या स्त्रिया, मुलं, वृध्द यांच्यावर झालेले अत्याचार समजताच आपणही तिथं जायचं, त्यांना मानसिक आधार द्यायचा, हे मी मनानं ठरवलं. पुष्पाताईंना माझी इच्छा सांगितली. पण घरी कसं सांगणार? आईबाबांना कसं समजावणार? खूपच अवघड होतं. आईला सर्व काही सांगितलं. पण बाबांना मी कोठेवाडीला जाणार आहे आणि तिथं काय झालं हे सांगितलं, तरी त्यांना पटवून देणं कठीण होतं. तरीही मी जाण्याचा निश्चय केला. गावात पोहोचताच गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर जे प्रश्न होते, जो तिटकारा होता, तो स्पष्ट जाणवत होता. तिथल्या एक आजी म्हणाल्या की, 'आमच्याबरोबर काय झालं हेच तुम्हाला विचारायचय नां? आणखी तुम्ही काय करणार आहात?' विचारणार, जाणार! प्रत्येक स्त्रीच्या चेहऱ्यावर हाच विचार स्पष्ट जाणवत होता. सगळे येतात. विचारतात. आणखी दुःख देतात आणि जातात. त्यांचा हाच विचार, हेच दुःख आम्हाला दूर करायचं होतं. त्यांच्या मनातला ताण दूर करायचा होता. याकरता आम्ही कोठेवाडीतच रहायचं ठरवलं. घरोघरी यासाठीच संपर्क करत होतो. एका घरात गेलो. घरात आईवडील उस तोडायला दुसऱ्या गावी ६ महिन्यांसाठी गेलेले. घरात आजीआजोबा, नात आणि नातू. अवघी चौदा वर्षाची नात स्वयंपाक करून सगळ्यांना जेवायला घालते. खूप आश्चर्य वाटलं इतक्या छोट्या वयात तिच्यावर ही जवाबदारी पडली होती.

काही जणांकडून कळलं, ज्या मुलींवर अत्याचार झाला, त्या मुलींना लगेच दूसऱ्या गावात पाठवण्यात आलं. पण त्या मुलींचं पुढं काय होणार? त्यांची मनःस्थिती कशी असेल? आपण आपल्या साध्या साध्या दुःखांना खरंच किती कवटाळून बसतो! आपल्याला आपली मनःस्थिती सावरायला माणसं तरी मिळतात. पण या मुलींचं काय? यांच हे अपार दुःख पाहून माझं दुःख काहीच नाही असं मला जाणवलं. ..... अशाही परिस्थितीत या सर्वांचं लाभलेलं प्रेम, जेवायला बोलावणं, 'माझी नातचं तू!' असं बोलणं हे मी कधीच विसरू शकत नाही. अशी वेळ कोणावर येऊ नये, अशी मी प्रार्थना करते.

कोठेवाडीतल्या त्या घटनेनंतर तिथं वीजपुरवठा सुरळीत झाला. पाणीपुरवठाही सुरू झाला. डांबराचे रस्तेही तयार झाले. सत्ताधारी, विरोधी पक्षाचे नेते सतत येतात, एकत्र येतात. कोठेवाडीचं भाग्यचं असं फिरतयं. तेवढ्यातच काही चतुर माणसं त्यांना शिताफीनं वरच्या आणि खालच्या वाडीवर नेतात. तिथंही राजकारणं. कोठेवाडीकरांना खरी आस्था किती आणि नुसतं कुतूहल किती, हेच कळेनासं झालंय. सर्व बायका गप्प बसतात. कपडे वस्तु यांचा वर्षाव होतोय. पण गेलेली अब्रू ? तीच कायं ती परत येणार नाही हेच दुःख मोठं आहे. त्यांचं खचलेलं मानिसिक बळ मापणार तरी कसं?

गाडीमधून परतीच्या प्रवासात येताना मन अगदी विषण्ण झालं होतं. असंख्य विचारांचं थैमान चाललेलं होतं. आतापर्यंत वाडी सगळयांपासून लांब होती. विकासापासून. प्राथमिक सुविधांपासून. शहरातल्या सुरक्षिततेच्या कल्पनांपासून आणि पोलिसांच्या संरक्षणापासूनही. अशा सर्वांना अशा परिस्थितीत दिलासा देणारी मानसिक आधार देणारी संवेदनाक्षम यंत्रणा आहे आपल्याकडे? तुमच्या दुःखात आम्ही

**मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करुन दुसऱ्याच्या हितासाठी एकजुटीने कार्य करण्यास शिका. याचीच आपल्या देशाला आज अत्यंत गरज आहे.**

आहोत. काही लागलं तर सांगा, अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करू, असा दिलासा देणारी, व्यवस्था आहे आपणाकडे? अत्याचारित महिलांचं, मुलींचं भवितव्य आज अंधारात आहे. शिक्षणाची, भावी आयुष्याच्या आणि लग्नाच्या बाबतीतही त्यांचा स्वीकार करण्याची शाश्वती कोण देणार?

एकूणच झालं ते वाईटच झालं. असेच प्रसंग यासारखे, यापेक्षा वाईटही प्रसंग देशभरात, समाजात घडत आहेत. 'हे टाळण्यासाठी प्रामाणिक व समाजबांधवांविषयी आपुलकी असणाऱ्या जास्तीतजास्त लोकांनी प्रशासकीय व राजकीय क्षेत्रात गेलं पाहिजे,' या माझ्या विचाराला या चार दिवसांचा व या प्रकरणाचा विचार केल्यावर एका गोष्टीची मनाला जाणीव झाली की, मला आयुष्यात केवळ माझ्यासाठी, घरच्यांसाठी काही व्हायचं नाही तर संपूर्ण समाजासाठी काही करायचं आहे. नागरिकशास्त्रातील व्यक्तिनिष्ठा, कुटुंबनिष्ठा यांच्यापासून मी समाजनिष्ठेकडे जायला लागलोय, असं वाटतं.

❋ ❋ ❋

# उध्वस्त मनांना सावरण्यासाठी ...

✍ श्री. भगवान दातार

***कोठेवाडीच्या घटनेनंतर 'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांचे एक पथक तेथील उध्वस्त मनांना सावरण्यासाठी गेले होते. या घटनेची नोंद घेऊन दै. लोकसत्ताने प्रसिध्द केलेला लेख पुनर्मुद्रित करीत आहोत.***

नगर जिल्ह्यातल्या पाथर्डी तालुक्यातलं 'कोठेवाडी' हे गाव बातम्यांचं केंद्र बनलं आणि साऱ्यांच्या नजरा तिकडे वळल्या. काहींचे पायही तिकडं वळले. कोठेवाडीतील उद्ध्वस्त मनं सावरण्याचा हेतू मनात ठेवून 'स्व-रुपवर्धिनी'चं एक पथक नुकतंच कोठेवाडीला जाऊन, नुसतं जाऊनच नव्हे, तर तिथं राहून परतलं. या पथकाबरोबरच्या चर्चेतल्या पहिल्या एक-दोन वाक्यातच या पथकाचं वेगळेपण जाणवलं. 'आमची कुणाचीच नावं छापू नका' असं या पथकातल्यांनी सांगितलं नि माझं पेन थोडंस अडखळलंच. असं म्हणणारे हल्ली फारच दुर्मिळ झाले आहेत. 'आम्ही सोबत कॅमेरा नेला नव्हता', असंही एक कार्यकर्ता सहजच बोलून गेला. प्रसिध्दीचा मोह टाळण्याचाच निर्धार त्यातून जाणवला. तिथल्या अत्याचारग्रस्त लोकांची भग्न मनं सांधण्याचं, त्यानां स्नेहपूर्ण दिलासा देण्याचं आणि नव्या जीवनाची उभारी देण्याचं उद्दिष्ट समोर ठेवून आम्ही तिथं गेलो होतो. आपलं म्हणणारं कोणीतरी अवतीभवती आहे. आणि ही माणसे अनोळखी असली तरी स्नेहाचा धागा अतूट आहे, हे तिथल्या

**अगदी कट्टर शत्रूच्या बाबतीत देखील हितकारक भाषा वापरा, सभ्य आणि न बोचणारी भाषा वापरा.**




लोकांना जाणवून देण्याची तळमळ या पथकात होती. अन्य मदतीचं अवडंबर न माजवता केवळ तेवढाच धागा बरोबर घेऊन हे कार्यकर्ते तिथं पोहोचले होते. ते गेले ते थेट त्या वस्तीत. वस्तीतलेच एक होऊन तिथं राहिले. तिथल्या घराघरातले, झोपडीझोपडीतले बनले. पाहतापाहता तिथल्या मुलांना या नव्या 'ताई-दादां'चा लळा लागला. सुरुवातीला बिचकतबिचकत 'सर' म्हणणारी मुलं त्यांना बिनधास्तपणे 'दादा' म्हणायला लागली. घराघरातल्या बाया-बापडयांना या पथकातल्या 'ताई'बद्दल आपुलकी निर्माण झाली. पाहतापाहता दुरावा संपला. पाच-सहा दिवसांच्या मुक्कामात या पथकानं गावाला आपलंसं केलं. हेच ते वेगळेपण. वास्तविक दरोड्याची घटना घडल्यापासून 'कोठेवाडी'त 'पाहुण्यांची रीघ लागली होती.

खडबडून जागे झालेले पोलीस, अन्य अधिकारी, मंत्रिगण आणि विविध पक्षांचे नेते यांनी गावात गर्दी केली होती. प्रत्येकजण यायचा आणि नव्या दमाने तेच ते प्रश्न पुनःपुन्हा विचारायचा. कोणी साडया घेऊन आले, तर कोणी भांडीकुंडी घेऊन. त्या बदल्यात कुणाला प्रसिध्दी कमवायची होती, तर कुणाला राजकीय फायदे. काहीच घेऊन न येणारा फक्त हा एकच गट असावा. सगळेच एका प्रेरणेने भारलेले. ठरलेल्या उद्देशाने ते तिथल्या वस्तीत मिसळून गेले. जे घडून गेलं, त्याच्या खपल्या काढायच्या नाहीत, हे आधीच त्यांनी ठरवलं होतं. उलट मानसिक धक्क्यातून गावकऱ्यांना बाहेर काढायचं, हाच त्यांचा उद्देश होता. सुरुवातीला बिचकून वागणारी गावकरी मंडळी एक-दोन दिवसांतच भरगच्च संख्येने कार्यक्रमात सहभागी व्हायला लागली. ही त्याचीच पावती होती. या कार्यकर्त्यांनी शिकवलेल्या नव्या खेळांमध्ये मुलं दमून गेली, त्यांची शाळा पुन्हा सुरु झाली. भजनांमध्ये गावकरी रंगून गेले. छोट्या छोटया व्याख्यानांमधले विषय बाया-बापडयांनाही आवडायला लागले. एकत्र येऊन केल्या जाणाऱ्या आरतीमुळे एकतेची भावना वाढायला लागली.सामुदायिकपणे काहीतरी करु अशी ऊर्मी निर्माण झाली. एका साध्या प्रसंगातून ही एकरुपता सहजपणे जाणवली. एका आजीबाईंच्या झोपडीवरुन विजेच्या तारा गेलेल्या. शेजारच्याच झाडाच्या फांद्या वाढलेल्या. त्या फांद्या त्या अतिदाबाच्या तारांवर घासल्या जाऊन सतत ठिणग्या उडत असत. आजीबाईंच्या झोपडीचं छप्पर गवताचं. आजूबाजूलाही अनेक ठिकाणी वाळलेलं गवत. त्यातून अनर्थ घडण्याची शक्यता एका कार्यकर्त्याच्या लक्षात आली. एक कुऱ्हाड मिळवून तो सरळ झाडावर चढला.त्याने सपासप फांद्या तोडल्या. ठिणग्या पडून अनर्थ घडण्याचा धोका टळला.'पुण्यातलं एक पोरगं आपल्यासाठी

**विकास म्हणजेज जीवन होय, संकुचितपणा हाच मृत्यू होय.**

धोका पत्करुन झाडावर चढून फांद्या कापतयं' हे पाहून त्या माऊलीचे डोळे वाहायला लागले. या पोरासाठी काय करु नि काय नको असं तिला झालं. तिनं धडपडत करुन दिलेला चहा, या कार्यकर्त्यांना, अमृताहूनही मोलाचा वाटला. जवळीक अशी साधत गेली. मनं जुळत गेली. या कार्यकर्त्यांना जाणवलेल्या काही गोष्टी विचार करायला लावणाऱ्या आहेत. गावात पोलीस पाटील नाही. कुठलंही दुकान नाही. चौथीपर्यंत एकशिक्षकी शाळा. मात्र नंतरची शाळा पाच किलोमीटर अंतरावर. म्हणजे चौथीच्या पुढे बहुतेकांचं, विशेषतः मुलीचं शिक्षण बंदच! गावातले बहुतेक तरुण स्त्री-पुरुष ऊस तोडणीसाठी परगावी गेलेले. गावात बहुतेकजण ५५-६० च्या वरचे. अशा गावात संरक्षणाची व्यवस्था ना सरकारने केली ना गावकऱ्यांनी. गावात ग्रामसेवक फिरकत नाही. एकशिक्षकी शाळेचे शिक्षक श्री.जगताप मुलांसाठी खूपच धडपडत करतात. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच खरं तर गावाचं गावपण टिकून आहे, पण ही शाळा वाढविण्याची किंवा त्यांना एखादा सहकारी देण्याची कोणतीही योजना नाही. 'स्व'-रूपवर्धिनीच्या पथकाने खूपच दूरवरचा विचार करुन काही योजना आखल्या आहेत. विद्यार्थ्यांचे एक शिबिर येत्या सुटीत कोठेवाडीत भरविण्याची त्यांची योजना आहे. गावातल्या दहावीच्या दोन मुलांना पुण्यात आणण्याची किंवा पुढच्या शिक्षणासाठी इतरत्र ठेवण्याची त्यांची कल्पना आहे. उत्साहाने भारलेल्या तरुण-तरुणींचे गट गावात सतत जात राहतील, अशी साखळी त्यांना तयार करायचीय.शासनानेही या गोष्टीचा धडा घेऊन अशा छोट्या वाडया-वस्त्यांसाठी काही खास योजना आखायला हव्यात. अशा गावात पोलिसांनी रोज रात्री दोन वेळा गस्त ठेवायला काय हरकत आहे? पोलीसपाटील, पोस्टमन, ग्रामसेवक, शिक्षक, स्वस्त धान्य दुकानकार, बँक., सहकारी सोसायटी आदींच्या मार्फत गावातला राबता कसा वाढेल याकडेही लक्ष द्यायला पाहिजे.रोजगारासाठी परगावी जाणाऱ्यांपेकी किमान काही जणांना तरी गावातचं रोजगार मिळाला तर असे प्रसंग उद्‌भवणारच नाहीत. 'खेडयाकडे चला' या महात्मा गांधीच्या संदेशांत विविध पातळ्यांवर किती गंभीर अर्थ भरलेले होते ते या अशा घटनांतून जाणवते. शहरातल्या नि शहरी वळणाच्या गावातल्या शहाण्या-सुरत्या लोकांनी खरंच या दूरवरच्या एकाकी वाडयावस्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवला तर कोठेवाडीसारख्या प्रकारांना नक्कीच आळा बसेल. 'स्व'-रूपवर्धिनीच्या या उपक्रमाने असा विचार करणाऱ्या अनेकांना प्रेरणा मिळू शकेल.



**जो प्रेम करतो तोच खरोखर जिवंत आहे; जो स्वार्थी आहे तो मेलेलाच आहे.**

# मला भावलेली वर्धिनी

**श्रीमती कमलताई टाककर**

सकाळची शाळा. वयोमानाप्रमाणे जाणवणारी दगदग. पण वर्ग गाठायचाय. दहा पायऱ्या संपल्या, वर्ग आला, हुश्श! सगळा ताण सगळी दगदग कशी एकदम निघून गेली. विचार आला, 'या दहा पायऱ्यांसारखीच गेली दहा वर्षेही कशी भुर्रकन् उडून गेली इथे येऊन!' संसार करताना स्त्रीच्या मनात कधी येतं का किती वर्षे झाली ते? तिचं सारं अस्तित्त्वच त्या संसारात सामावून गेलेलं असतं. वर्धिनीच्या सहवासातही माझं तसचं झालंय! इथं अगदी घरातल्या सारखचं प्रेम, आपुलकी, आदर, आस्था आणि आनंदही!

वर्धिनीत प्रवेश झाला तो मनाच्या एकाकी अवस्थेत ! पण वर्धिनीनं हळुवार फुंकर घालून, हे एकाकीपण नाहीसं केलं. बालवाडीच्या सर्वात लहान गटाचं काम पाहू लागले आणि आजतागायत त्यातंच रमले. म्हटलं तर सोपं, म्हटलं तर फारच कठीण असतं हे वय सांभाळणं! सर्वच गोष्टी नवीन. शाळा म्हणजे काय? बाई म्हणजे काय? सर्वच न उमगणारं. आणि या न कळत्या अज्ञानी वयातल्या छोट्यांना ज्ञानाची हळूच, नकळत ओळख करून देणं, म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हे! पण प्रत्येक वेळेस आव्हान स्विकारून नवनिर्मितीचा जो आनंद वर्षअखेर मिळतो, तो शब्दात सांगणं कठीण.

इथं आल्यानंतर या मुलांना घडवताना आपल्या कलागुणांना विकसित करण्याची संधी मिळते. इतर संस्थांप्रमाणेच इथंही बालवाडीचा अभ्यासक्रम ठरलेला असला, तरी इथं आपल्या कल्पनांना अधिक वाव मिळतो असा माझा अनुभव आहे. आमच्या बालवाडीच्या प्रमुख स्वतःही नवनवीन उपक्रम राबवीत असतात आणि इतरांनाही संधी देतात. एकूण इथं साचेबध्दता नाही. मुलांचं हे वय आहे चौफेर बागडायचं, ताणरहित जीवन जगण्याचं. याचा पूर्ण विचार करून इथले वर्षभराचे कार्यक्रम आखले जातात. इथं साजरे होणारे बालचमूंचे सण, उत्सव तर मोठ्या माणसांनाही थक्क करून सोडणारे असेच असतात. अहो आमचा 'विठोबा' आणि आमची 'दिंडी' पहाल, तर म्हणाल वारीच घडली. विठोबाचं दर्शन झालं, डोळ्यांचं पारणं फिटलं !

अनुभवाच्या, वाढत्या वयाच्या देणगीमुळे तयार झालेल्या पक्व बुध्दीलाही कधीकधी या मुलांच्या अचाट प्रश्नांना असे काही सामोरं जावं लागतं की, बस्स्! एकदा एका चिमुरड्यानं विचारलं, **'आजी कुककुक गाडीला किती चाकं असतात?'** मुलांना गाडीला चावी देता येत नाही म्हणून चावी देऊन गाडी सोडली, तर एकजण



**जगाचे हित करणे हेच आपले उद्दिष्ट आहे; आपल्या नावाचा डंका चोहोकडे वाजावा हे काही आपले उद्दिष्ट नव्हे.**



म्हणाला **'बाई खेळ आमचा आहे की, तुमचा ?'** 'कावळ्यानं हुशारीनं' एकेक खडा टाकून रांजणातील पाणी वर आणलं नि प्यायलं, ही गोष्ट अगदी रंगवून रंगवून सांगितल्यावर एकजण म्हणतो कसा, **'वेडाचं आहे, 'स्ट्रॉ नाही का घ्यायचा?'** बोला, काय उत्तर देणार! कॉम्प्युटर चालविणारा कावळा अशा गोष्टी आता सांगाव्या लागणार असं वाटलं. मन भारावून जाते अशा वेळेस. आणि त्या क्षणी मिळणारा आनंद अवर्णनीयच!

वर्धिनीत तसे बरेच उपक्रम चालतात. बालशाखा, शिवणवर्ग, अभ्यासिका, एक ना अनेक. प्रत्येक क्षेत्राशी रोजचा संबंध येत नसला, तरी रेल्वेच्या डब्यांसारखे येथील सर्व विभाग एकसंघ, एकत्रित आहेत. प्रत्येक व्यक्तीत काही सुप्त गुण असतात. परमेश्वराने प्रत्येकाला काही ना काही 'प्लस पॉइंट' दिलेला असतो. त्याला असं वाटत असतं की, दैनंदिन कर्तव्यापेक्षा काहीतरी अधिक, पण वेगळं करावं. प्रत्येकाला ते जमतंच असं नाही, विशेषतः स्त्रीला. पण वर्धिनीमुळे उशीरा का होईना, संसाराव्यतिरिक्त काही वेगळं करण्याचा आनंद मला इथे मिळाला. याचं ऋण शब्दात फेडता येण्यासारखं नाहीत. अहो! मला वाटते ही एकच अशी संस्था असेल की, जिथे रिटायरमेंटला वयाची मर्यादा नाही. भगवंताकडे आता एकच प्रार्थना आहे की, त्यानं माझी गात्रं शेवटच्या क्षणापर्यंत चालू ठेवावीत आणि वर्धिनीच्या पायऱ्या शेवटच्या क्षणापर्यंत चढता याव्यात!

---

## मंतरलेले दिवस

✍ **कु. लता टिळेकर**

११ नोव्हेंबर २००० ते २४ फेब्रुवारी २००१ हे दिवस वर्धिनीच्या वास्तूत मंतरलेले होते असे म्हटले तर अतिशयोक्ती नक्कीच होणार नाही. हो! हे दिवस मंतरलेलेच होते! पाटणकर सरांच्या वर्गाने भारावलेले होते. सरांनी दिलेल्या शिकवणीने. सरांच्या शिस्तीने.

पाटणकर सरांचा इंग्रजीचा तास म्हणजे सर्वत्र चर्चेचा विषयच होता. हा तास नेमका कसा असणार? त्यात इंग्रजी बोलायला शिकवणार का? वगैरे वगैरे. पण पाटणकर सरांनी आधीच स्पष्ट केले होते की, हा काही इंग्रजी बोलायला शिकविण्याचा वर्ग नव्हे. तर, जीवन घडविण्याचा प्रशिक्षण वर्ग आहे. इंग्रजी संभाषण हा एक त्यातील भाग असणार आहे. त्यामुळे ह्या वर्गाचे कुतूहल जरा जास्तच जागृत झाले होते. वर्ग सुरू करण्यापूर्वी त्यांनी त्यांच्या वर्गाचे काही नियम सांगितले होते. १ मिनिटाच्या वर उशीर झाला तर ५० रू. दंड, एकदा जरी वर्ग बुडवला तर ठेव जप्त. वर्ग बरोबर आठ म्हणजे आठलाच चालू होणार.


सर्व नियमांसहित अखेर हा वर्ग दि. ११ नोव्हेंबर २००० ला सुरू झाला. कधी नव्हे ते आम्ही सगळे जण वेळेच्या आधी १० मिनिटे हजर होतो. शुक्रवार व शनिवार अशा दोन बॅचेस सुरू झाल्या. शुक्रवार-शनिवार आला की, सर्वांना वेध लागायचे पाटणकर सरांच्या वर्गाचे. अनेक प्रकारच्या कसरती करून, व्यवस्था लावून ही आठची वेळ पाळायचीच.

**केवळ स्वतःचाच उत्कर्ष व्हावा या भावनेचा, कलहप्रियतेचा आणि परस्पराविषयीच्या मत्सराचा तुम्ही नेहमीसाठी त्याग करावा .**

नाही तर दंड. आपण म्हणतो की, 'Time is Money!', पण ह्या कालावधीत आम्हाला वाटू लागले, 'No,Time is more than Money!' जे शब्दांनी कळले नसते ते कृतीने अंगिकारता आले.

जीवनात आवश्यक असणारे साधे-साधे तत्त्व व्याख्यान न देता सर गोष्टींमधून इतके खोलवर रूजवायचे की, ती तत्त्वं लगेच आपण अवलंबिलीच पाहिजेत. 'हसा आणि प्रश्न सोडवा. कुणालाही कमी लेखू नका. इतरांचे ऐकून घ्या. तुमचे चुकले असे कुणालाही स्पष्ट सांगू नका. दुसऱ्यांच्या मतांचा आदर करा. पण स्वतःच्या निर्णयावर ठाम रहा. देवाने आपल्याला काय दिले नाही त्यापेक्षा काय दिले त्यांकडे पहा. इतरांना महत्त्व द्या. व्यर्थ चिंता करू नका. स्वतःला कामात व्यस्त ठेवा इ.

शिकविण्याबरोबरच सर आम्हाला काही गृहपाठ सांगत असत. एखादी कथा इंग्रजी मध्ये सांगणे. सर्वात आनंदाचा प्रसंग, अपमान झालेला प्रसंग, तुमची फसवणूक झालेला प्रसंग, कवितेचे वाचन इत्यादी गोष्टी इंग्रजीमध्ये सादर करायच्या असत. हळू-हळू आमचा इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास वाढत होता. वर-वर पाहता हा गृहपाठ खूप साधा वाटत असला तरी प्रत्यक्ष ते सादर करताना कळत-नकळत सरावाचे महत्त्व पटत होते. भूतकाळातील काही आठवणींचे क्षण, काही खोलवर रूजलेले प्रसंग यांचा पुनःप्रत्यय येत होता, त्याचे सिंहावलोकन करत होतो. त्या त्या घटनेशी आम्ही



तादात्म्य पावत होतो.

नेहमीच्या धकाधकीच्या, चाकोरीच्या, आखीव-रेखीव दिनक्रमातून अनुभवलेले काही विरंगुळ्याचे, नवीन अविष्काराचे क्षण म्हणजे पाटणकरांचा वर्ग, असे म्हणायला काहीच हरकत नाही. आपापल्या विभागात स्वतंत्रपणे काम करणारे सारे छोटे-मोठे कार्यकर्ते ह्या तासाला मात्र फक्त पाटणकर सरांचे विद्यार्थी असायचे. त्यामुळे इथे आल्यावर मी अमुक नि मी तमुक, असले सारे अभिनिवेश कधीच गळून पडायचे. एक आगळंच एकजिनसी, निकोप, सौहार्द्रपूर्ण असे वातावरण आम्ही या वर्गात अनुभवलें. अनेकजण स्वतःच्या, व इतरांच्या भावविश्वात डोकावू शकले. मनाच्या खोल कप्प्यात दडलेल्या भाव-भावना, काही उपेक्षित क्षण या साऱ्यांची मुक्त उधळण झाली. ही उधळण मुक्त असली, तरी ती स्वैर मात्र नव्हती. संयमाचे एक अनामिक बंधन तिला होते. सरांच्या शिकवणीने मन संस्कारीत होत होते. एकमेकांच्या अनुभवाने जीवन समृध्द होत होते.

'जगन्नाथाची' एक कविता सर सतत सांगत असत. हा जगन्नाथ म्हणजे फक्त स्वतःपुरती जगणारी एक स्वकेंद्रित प्रवृत्ती. सर नेहमी सांगत, 'तुम्ही असे जगन्नाथ होऊ नका'. ह्या कवितेतील जगन्नाथ न होता जर खऱ्या अर्थाने 'जगन्नाथ' होण्याचा आपण प्रयत्न केला, तरच पाटणकर सरांचा तास सर्वार्थाने सार्थ ठरेल.

**तुम्ही सर्वांनी पृथ्वीमातेसारखे सर्वसहिष्णू झाले पाहिजे. तुम्ही जर तसे होऊ शकलात तर सारे जग तुमच्या पायाशी लोळण घेईल.**

# काळोखातील काजवे

कु. लता टिळेकर

एखादा क्षण अचानक असा येतो की, पुन्हा नव्याने आपल्या ध्यासाला नवी उभारी मिळते. आपण जे करीत आहोत ते कुठेतरी रुजतं आहे, याची प्रचीती येते. प्रवाह झुळझुळतोय याची साक्ष पटते. पिवळया पानांच्या आड एक चिमुकलं पान उगवत आहे, याची अनुभूती येते. घटना साधी, पण परीस क्षणाची झळाळी लाभलेली.

...नेहमीप्रमाणे सहा वाजता शाखेतील विद्यार्थिनी एकत्र जमल्या. आज शाखा लक्ष्मीमाता मंदिरात होती. मंदिराजवळ एक मोठे स्टेज आहे. त्या स्टेजवर पत्र्याची उंच शेड आहे. त्या स्टेजवर शाखा सुरु झाली. काही वेळातच अचानक काळे ढग जमून आले. सोसाटयाचा वारा वाहू लागला. विजा कडाडू लागल्या. क्षणातच पावसाच्या मुसळाधार सरी सुरु झाल्या. दिवेही गेले. सतत भरभरुन देणारा हा निसर्ग, पण हे देणंही कधी किती रौद्र रुप धारण करु शकते याची प्रचीति देणारा हा हस्त नक्षत्राचा पाऊस. आजूबाजूला एवढे तांडव चाललेले असूनही एकाही लहानग्या वर्धिकेच्या चेहऱ्यावर यत्किंचितसुध्दा अस्वस्थतेचा भाव नव्हता. शेड चारही बाजूंनी उघडी असल्याने सर्व दिशांनी पाणी आत येत होते. त्यामुळे सर्वांना खेळ बंद करावा लागला. खेळ बंद होताच साऱ्यांनी त्यातल्या त्यात कोरडया जागी - खरं म्हणजे कमी ओल्या जागी - गोलात बसून गाणी म्हणण्यास सुरुवात केली. सतत कोसळणाऱ्या पावसाच्या धारा, त्यातून निर्माण होणारी एक लय, व विविध गीतांची यांची जणू धमाल जुगलबंदीच चाललेली होती ! वेळ जात होता पण पावसाचा मात्र थांबायचा विचारच नव्हता. शाखा संपली, तरी सगळे-जण घरी कसे जाणार हा मोठा यक्ष प्रश्नच होता. शाखेवरच्या ताईसुध्दा विचारात होत्या. तितक्यात शाखेतील एक वर्धिका म्हणाली,'ताई माझे घर समोरच आहे आणि माझी बहीण एकटीच घरी आहे. मी जरा तिला बघून लगेचच येते.' ती वर्धिका घरी गेली पण तिला काळजी फक्त स्वतःच्या एका बहिणीचीच नव्हती तर शाखेतील सर्व बहिणींची तिला काळजी होती. तिनं मोठ्या तत्परतेनं व शाखेतल्या कुणालाही कल्पना न देता सहासात छत्र्या जमा करुन आणल्या. मुलींनीच मग एकाच दिशेने राहणाऱ्या वर्धिकांचा एकेक गट अशा प्रकारे गट पाडले, व सगळयाजणी- त्यातल्यात्यात- न भिजता जातील अशा रीतीनं छत्र्यांचं वाटप केलं. शाखेतील ताई शांतपणानं, तृप्त डोळयांनी हे सारं बघत होत्या, वर्धिकांमधलं उत्कटं प्रेम, सहानुभूती, आपलेपणा, सारंच काही कळत नकळतपणे जणू साकारत होतं. खेळ खेळताना आपल्या समोर भांडणाऱ्या या वर्धिका प्रसंगी एकमेकांच्या 'पालकही' होऊ शकतात, ही जाणीवच अत्यंत आल्हाददायी होती. वर्धिकांची सोय झाली. सर्वांची घरी जाण्याची व्यवस्था लावणाऱ्या या दोघी वर्धिका व ताई एवढयाच आता शाखेत उरल्या होत्या.



**जो आज्ञेचे पालन करणे जाणतो तोच आज्ञा देणेही जाणतो. प्रथम आज्ञेचे पालन करावयास शिका.**


अकस्मात एक पालक रिक्षा घेऊन आले. ताईंना बसस्टॉपवर जायचे होते, व रिक्षाही त्याच दिशेने जाणार होती. या दोन वर्धिकांचे घर तर तेथेच मंदिराजवळ होते. पण हया पठ्ठया घरी जाण्याऐवजी त्या रिक्षात चढल्या. ताईंनी अनेक प्रकारे विरोध करुनही त्या काही ऐकायला तयारच नव्हत्या. त्याचं एकच पालुपद चाललं होतं, ‘ताई!, तुम्हाला आम्ही बसस्टॉपवर सोडवायला येणार. तुम्हाला बस मिळाल्याशिवाय आम्ही घरी जाणारच नाही’. ताईंच्या कुठल्याही विरोधाला न जुमानता या मुली बसस्टॉपवर आल्या. खूप वेळ बस येण्याचे काही चिन्हच दिसत नव्हते. मग त्या वर्धिकांचा आग्रह सुरु झाला, ‘ताई आमच्या घरी राहायला चला, तुमच्या घरी फोन करुन सांगा. किती ओल्या झाल्या आहात तुम्ही!’ इयत्ता सातवीतील वर्धिका डोळयात पाणी आणून-आणून ताईंना विनंती करत होती. ‘ताई! चलाना घरी, इतर वेळेस कशा संपर्काला घरी येता तसाच चांगला संपर्क होईल, गप्पा होतील, चलाना!’ हया एवढयाश्या चिमुरडीकडे कोठून आले हे शहाणपण? काही क्षण तीही जणू ताईंची पालकच झाली होती! केवढी काळजी, केवढा आग्रह! सारं सारंच अनपेक्षित होतं. ज्यांचे आपण पालक व्हावे त्या बालकांनीच आपले पालकत्व करावे हयासारखी विलक्षण अनुभूतीच नाही! या घटनेवरुन खरोखरंच असं वाटल, ‘आपण जे बोलतो ते सगळेच वाया जात नाही. अनेक मुठीत, अनेक मनांत संवेदनेचं बीज असतंच. सगळं रुजत नसेलही, पण सगळं जळूनही जात नाही. त्यातल्याच काही बीजांना अंकूर येतात. मात्र तेव्हांचं समाधान हे फक्त आपलं आणि आपलंच असतं. असे समाधान देणारे अनेक क्षण जणू लखलखत्या ज्योती गर्भात धारण करणारे काळोखातले काजवेच!

☆ ☆ ☆

## आता केवळ यांचे स्मरण शक्य आहे

गेल्या वर्षभरात वर्धिनीच्या परिवारातील काही कुटुंबामध्ये निधनाच्या दुःखद घटना घडल्या. तसेच समाजात ज्यांचे मोठे नाव होते, कर्तृत्व होते, अशा मान्यवरांचेही दुःखद निधन याच कालावधीत झाले. या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

श्री. लक्ष्मणराव भिडे
श्री. वसंतराव केळकर
श्री. बी. जी. देशपांडे
श्री. प्र. ल. पटवर्धन
श्री यशवंत माने
श्री. वि. वा. आवटे
सौ. दगडाबाई परदेशी



डॉ. श्रीमती कमल पटवर्धन

श्री. शिवरायजी तेलंग
श्री. गिरीष गोसावी
श्री. सुनील जमखंडे
श्री. रमेश चौधरी
चित्रकार श्री. अरूण फडणीस
श्री. उत्तमराव कानिटकर
श्रीमती जानकीबाई र. तांबट

**आपल्याला संघटनेची आवश्यकता आहे. संघटना हीच शक्ती आहे आणि आज्ञाधारकपणा हेच तिचे रहस्य आहे.**


# कसरत जमाखर्चाची

वर्धिनीच्या कामाचे स्वरूपच असे आहे की, जेथे कायम कामाच्या वाढीचा संभव आहे. वर्धिनीसारखे मूलभूत काम जागोजाग उभे रहायला हवे, अशी प्रामाणिक इच्छा या कामाला आर्थिक बळ देणाऱ्यांच्या मनात असते. ज्या संस्थेला आपण आर्थिक सहाय्य केले तेथे काम कसे चालले आहे? वाढते आहे का? येणारा पैसा कसा वापरला जातो? होणाऱ्या एकूण खर्चापैकी मूळ उद्दीष्टपूर्तीसाठीच्या कार्यक्रमांवर किती व व्यवस्थापनावर किती? असे अगदी मूलभूत प्रश्न अनेकांच्या मनात असतात, व ते असायलाही पाहिजेत. गेल्या संपूर्ण वर्षात एकूण काम कसे झाले, याचा आढावा या कार्यवृत्तातून आपल्याला समजला असेलच. आर्थिक स्थितीबद्दल बोलायचे, तर गेल्या संपलेल्या आर्थिक वर्षात (२०००-२००१) एकूण झालेल्या खर्चापैकी ८८.१९% **खर्च हा उद्दिष्टपूर्तीसंबंधीच्या कार्यक्रमांवर तर ११.८१% खर्च हा व्यवस्थापकीय बाबींवर झाला.** वर्धिनीचे काम वाढते रहाणार. त्यामुळे, तसेच महागाईत होणारी वाढ, व ठेवींवरील व्याजात होत जाणारी घट यामुळे आर्थिकदृष्ट्या अधिकच मजबूत पायावर उभे रहायला हवे आहे. यादृष्टीने कायमनिधी उभा करण्याचे काम सुरू झाले असून गेल्या आर्थिक वर्षात जमा झालेल्या व्याजातून ४३% आवर्ती खर्चाची गरज भागविता आली.




उरलेली रक्कम ही अर्थातच आपल्यासारख्यांच्या सक्रीय सहभागातून उभी राहिली. वर्धिनीच्या कामाच्या विस्ताराची गती, व महागाईची स्थिती पाहता **कायमनिधी हा किमान तीन कोटी रूपये असण्याची आवश्यकता आहे.** या कामी आपले अधिकाधिक सहकार्य मिळावे, ही अपेक्षा आहे. आपण सहाय्य करीत आहातच; परंतु आपले मित्र, सहकारी, नातेवाईक अशांजवळ आपण या कामासंबंधी बोलू शकलात, तसेच त्यासंबंधी आम्हाला काही सुचविलेत, तर त्यांना व आपल्यालाही भेटायला, व वर्धिनीच्या कामाविषयी माहिती द्यायला आम्हाला नक्कीच आवडेल.

## आर्थिक चित्र २०००-२००१




**पक्षपात हाच सर्व वाईट गोष्टींचे मुख्य कारण आहे हे जाणून असा.**

# दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

१) **रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख - **श्री. मयूर लांजेकर**
शाखापालक - **श्री. शिरीष पटवर्धन** (☎ ६०५५३८२)

१) **अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे -१६
शाखाप्रमुख - **श्री. गणेश काटे**
शाखापालक - **र. ज. नरवणे** (☎ ५६७६०७७)

३) **विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर,
वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. रवींद्र चव्हाण**
शाखापालक - **र. ज. नरवणे** (☎ ५६७६०७७)

४) **अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. दत्तात्रय सकट**
शाखापालक - **श्री. रा. ल. देवपूरकर** (☎ ४२१२०६१)

५) **सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे - ५२
शाखाप्रमुख - **श्री. केदार भंडारे**
शाखापालक - **श्री. सुधाकर शं. मुळे** (☎ ४३५१७०३)

६) **योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे-३०
शाखाप्रमुख - **श्री. सुरेंद्र खेडकर**
शाखापालक - **सौ. मेघना अत्रे** (☎ ४४५४६७३)

७) **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११
शाखाप्रमुख - **कु. आरती तांबे**
शाखापालक - **श्री. शिरीष पटवर्धन** (☎ ६०५५३८२)
युवतीप्रमुख - कु. विद्या कुडलिंगार (☎ ६०५६३६१)

८) **राजमाता जिजाऊ शाखा**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय,
शाळा क्र. ७४ लक्ष्मीनगर, पुणे - ९
शाखाप्रमुख - **कु. कविता गौड**
शाखापालक - **श्री. अविनाश जोशी** (☎ ४४४१०३३)

९) **आजोळ**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख - **कु. छाया गायकवाड**
सहाय्यक - **सौ. मंजूषाताई कुलकर्णी** (☎ ६१२६८३५)
प्रकल्प प्रमुख - **श्री. जयंत कवठेकर** (☎ ४२२१२९४)
संपर्क - सोम. ते शुक्र. स. १.३० ते ५

१०) **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **कु. आरती वडके**
शाखापालक - **श्रीमती पुष्पाताई नडे** (☎ ६१२१७०४)

११) **शारदामणि महिला विभाग व बालवाडी 'पाकोळी'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
प्रकल्पप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे** (☎ ६१२१७०४)
संपर्क - सोम.ते शुक्र.स. १०ते१, शनि.९ते १०.३०

१२) **संगणक विभाग**
विभागप्रमुख - **श्री. अविनाश जोशी** (☎ ४४४१०३३)
श्री. निशिकांत बाईकर, कु. सविता चोरडिया
कु. सुलक्षणा मिलारवे
संपर्क - सोम.ते शुक्र. दु. १२ ते सायं ५

१३) **स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र**
विभागप्रमुख - **श्री. संजय तांबट** (☎ ६१२१७०४)
कार्यालयप्रमुख - कु. दिपाली पवार
संपर्क - सोम.ते शनिवार दु. १२ ते ५ सायं ६ ते ८

१४) **फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**
विभागप्रमुख - **श्री. सुनील कुलकर्णी** (☎ ६१३७६०९)

१५) **कार्यालय** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी
श्री. अभ्यंकर, श्री. भंडारे (☎ ६१२१७०४,६१३४३१०)
**संपर्क** - सोम.ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५॥३०

## दैनंदिन शाखांसाठी संपर्क :


सोम. ते शुक्र. सायं ६.१५ ते रात्री. ८.३०.
शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०.
रविवार स. ७.३० ते १०.००

## प्रधान शाखापालक :

श्री. दि. दा. जोशी,
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे - ३७.

गाजावाजा न करता, शांतपणे व धीर धरुन एकसारखे कार्य करीत राहा. जाहिरातबाजीच्या व नावाच्या पाठीमागे लागू नका.


# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २००१





## प्रार्थना


नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥
हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥ १ ॥



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुध्द बुध्दीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती - ध्यास हा ॥३॥



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥